पंधराव्या शतकात होऊन गेलेले संत कबीर हे हिंदी साहित्याच्या आरंभकालातील बहुधा सर्वश्रेष्ठ गीतकवी आणि गूढवादी होते. नंतरच्या शतकांत त्यांच्या काव्याचा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केवळ हिंदी साहित्यावरच नाही, तर उत्तर भारतातील जनमानसावर अत्यंत खोल असा प्रभाव पडला. हिंदू व इस्लाम या दोन्ही धर्मातील अर्थहीन रूढी व आचार यांवर त्यांनी प्रखर टीका केली. आणि दोन्ही धर्मांचे अंतिम उद्दीष्ट हे समान व एकच असल्याचे सांगत, त्यांनी दोन्ही धर्मांना जवळ आणण्याचा प्रयत्न केला.

डॉ. प्रभाकर माचवे यांनी या पुस्तिकेत प्रथम संत कबिरांच्या चरित्राविषयी उपलब्ध असलेल्या सामग्रीचा परामर्श घेतला आहे. नंतरच्या प्रकरणात, तात्त्विक गूढवादाच्या क्षेत्रात कबिरांचे योगदान, यासंबंधीचे आकलन येते. अखेरीस डॉ. माचवे कबिरांचे काव्य आणि हिंदी भाषा व साहित्य यांच्या विकासातील त्यांचे स्थान याचे मूल्यांकन करतात.

**Kabir (Marathi), Rs. 40**

ISBN 81-260-1145-9

24 भाषांमधून पुस्तके प्रकाशित करणारी साहित्य अकादेमी,
जगातील सर्वांत मोठी प्रकाशन संस्था

Website : http://www.sahitya-akademi.gov.in

भारतीय साहित्याचे निर्माते

# कबीर

**प्रभाकर माचवे**



भारतीय साहित्याचे निर्माते

# कबीर

साहित्य अकादेमी

लेखक

**प्रभाकर माचवे**

भाषांतरकार

**जयप्रकाश सावंत**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | 1 |
| 1. | चरित्र | 3 |
| 2. | तत्त्वज्ञान | 14 |
| 3. | काव्य | 25 |
| 4. | काव्यानुवाद | 33 |
| | परिशिष्ट | 46 |
| | ग्रंथसूची | 50 |

# प्रस्तावना

माझे मित्र डॉ. प्रभाकर माचवे यांनी या छोटेखानी पुस्तकात पंधराव्या शतकातील थोर धार्मिक संत कबीर यांच्याबद्दल फार चांगल्या प्रकारचे विवेचन केले आहे. हिंदू धर्म व इस्लाम या दोन महान धर्मांमध्ये त्या काळात संघर्षाचे वातावरण होते. दोहोंमधील अर्थहीन रूढींवर आणि कर्मकांडावर टीका करत व त्यांवर प्रहार करत कबिराने या दोन्ही धर्मांना एकत्र आणण्याचे प्रयत्न केले. दोन्ही धर्मांचे अंतिम ध्येय एकच व समान आहे, या विचाराचा त्याने प्रसार केला. तो कट्टर रामभक्त होता आणि त्याच्या मते राम विष्णूचा अवतार नव्हता. त्याचा 'राम' निर्गुण, निराकार होता आणि तो मुस्लिमांच्या 'रहीम'पेक्षा कुठल्याही तऱ्हेने वेगळा नव्हता. व्यावहारिक शिकवणुकीत कबीर कठोर नैतिक आचरणावर भर देतो आणि अंधश्रद्धांना विरोध करतो. रामाबद्दल प्रेमाची आणि समर्पणाची भावना व्यक्त करताना त्याची भाषा प्रसन्न व मधुर असते. सामाजिक सुधारणांबाबत बोलताना मात्र ती कठोर आणि झोंबणारी होते. गुरू नानक तसेच अन्य महान शीख गुरू यांना कबिराबद्दल मोठा आदर वाटत असे. कबिराने हिंदूंमधल्या जातिभेदावर तीव्र शब्दांत टीका केली. मूर्तिपूजा, अवतार-माहात्म्य आणि परलोकात लाभ मिळवण्याच्या हेतूने पवित्र नद्यांमध्ये स्नान करून पुण्यसंचय करणे, अशा प्रकारच्या धारणांची त्याने कठोर भाषेत हजेरी घेतली. मुस्लिमांचे मशिदीला चिकटून राहणे, तसेच सुन्ता-अजान-नमाज-रोजा या गोष्टींचे त्यांच्यामधील अवडंबर यांवरही त्याने अशाच तऱ्हेने हल्ला चढवला.

कबिराच्या व्यक्तिगत अनुभवांची खोली आणि त्याच्या विचारांची भव्यता यांमुळे त्याच्या काव्याला महानता प्राप्त होते. हे विचार तो साध्या शब्दांतून, अपारंपरिक पद्धतीने व्यक्त करतो. अर्थहीन रूढींवर प्रहार करताना त्याची भाषा अत्यंत आक्रमक होत असली तरी तिच्यात कुठेही कडवटपणा येताना दिसत नाही. परमतत्त्वावरच्या दिव्य प्रेमाच्या भरात असताना तर ती तिचे सर्वांत सुंदर रूप धारण करते. कबीर म्हणतो, 'ऐक माझ्या मित्रा। तोच जाणतो जो प्रेम करतो। प्रियेबद्दल प्रेमाची आस नसेल। तर व्यर्थ आहे देहाला सजवणे-नटवणे। व्यर्थ आहे डोळ्यांना दिव्यांजन लावणे.' आणखी एका ठिकाणी तो म्हणतो, 'ईश्वराच्या विरहाची वेदना देहात भुजंगासारखी वेटोळे घालून बसली आहे. या भुजंगावर कुठलाही मंत्र चालत नाही. ज्याचा रामाशी वियोग झाला आहे, असा माणूस जगूच शकत नाही. जगला तर त्याला वेड लागेल.' परमप्रियावरच्या अशा उत्कट प्रेमाची भावना सुफी परंपरेतल्या प्रेमाच्या संकल्पनेशी जुळणारी आहे.

ज्या नाथपंथी योग्यांकडून कबिराने रूढिनिष्ठ कर्मकांड आणि अंधश्रद्धा यांबद्दलच्या तीव्र

नापसंतीचा वारसा घेतला, तेही त्याच्या टीकेतून सुटलेले नाहीत. कबिराचे म्हणणे असे होते की, हे योगी हठयोगी आचरणावर अनावश्यक जोर देत भक्तीची किंवा दिव्य प्रेमाची पूर्णपणे उपेक्षा करत आहेत. कबीर ईश्वराशी सहज होणाऱ्या मिलनाचा, 'सहज-समाधी'चा पुरस्कार करतो -

मी आपले डोळे मिटून घेत नाही
मी कान बंद करून घेत नाही
मी माझ्या कायेला पीडा देत नाही
मी खुल्या डोळ्यांनी पाहतो, हासतो
त्याचे सौंदर्य चहूदिशांना पाहतो

या दिव्य प्रेमाच्या संकल्पनेची पूर्वअट आहे आपल्या अहम्चे संपूर्ण विलोपन. कबीर म्हणतो, 'अश्रू ढाळून काहीही पदरात पाडून घ्यायला हे काही मावशीचे घर नाही. इथे प्रवेश करायचा असेल तर प्रथम अहम् गळून पडायला हवा.'

इ. अंडरहिल म्हणतात, 'कबिराची दिव्य अनुभूतीची धारणा मूलत: गतिप्रधान आहे. ती आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी तो बहुतेक वेळा गतीची प्रतीके वापरत असतो. उदाहरणार्थ 'नाचणे' किंवा 'प्रेमरज्जूंनी बांधलेल्या विश्वाच्या चिरंतन झुल्यावर झोके घेणे' अशा अद्‌भुत आणि आधुनिक प्रतिमा त्याच्या काव्यात सतत आढळतात.'

मध्ययुगीन भारतातील जीवनावर आणि साहित्यावर कबिराचा फार मोठा प्रभाव पडला. हिंदी साहित्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना भक्तिपरंपरेमधल्या दुसऱ्या शाखेतील एक महान भक्त कवी तुलसीदास यांच्याशीच करता येईल.

डॉ. माचवेलिखित या पुस्तकात धार्मिक सहिष्णुता, भ्रातृभावाचा प्रसार, सामाजिक सुधारणा आणि चिंतनशील साहित्य आदी क्षेत्रांमध्ये या संतकवीने जे योगदान केले आहे, त्याचा फार चांगला परिचय करून दिला आहे. वैश्विक धर्माचे आणि श्रेष्ठ साहित्याचे चाहते या पुस्तिकेचे नि:संशय स्वागत करतील.

**हजारीप्रसाद द्विवेदी**
भारतीय साहित्याचे टागोर प्राध्यापक

पंजाब विद्यापीठ
चंदीगड 14
20 ऑक्टोबर 1967

# 1
# चरित्र

कबिराच्या चरित्रासंबंधीच्या ऐतिहासिक तथ्यांच्याबाबतीत एकवाक्यता आढळत नाही. इतिहासकार, साहित्य-चिंतक आणि कबीरपंथी अनुयायी यांच्यातही एकमत होताना दिसत नाही. कबिराच्या रचनांमध्ये आत्मपर असे फारच कमी आहे. त्यातूनही जी काही सूत्रे सापडतात त्यांच्या साहाय्याने, तसेच काही अगदी ऐकीव गोष्टींचाही आधार घेऊन त्याच्या चरित्राची एक सर्वसाधारण रूपरेषा मांडण्याचा हा प्रस्तुत प्रयत्न आहे.

कबिराने त्याच्या एका पदात जयदेव आणि नामदेव यांचा परोक्षरीत्या गुरूच्या नात्याने उल्लेख केलेला आहे. जयदेव बाराव्या शतकात होऊन गेले तर नामदेव तेराव्या. *आईन-ए-अकबरी* या 1596 मध्ये लिहिल्या गेलेल्या ग्रंथात कबिराविषयी 'आता हयात नसलेल्या महान संतांपैकी एक,' अशा स्वरूपाचा उल्लेख आहे. दुसरीकडे मौलवी गुलाम सरवर आपल्या *खजनतुल आसफिया* मध्ये कबिराचे जन्मसाल 1594 असे देतात, तेही चुकीचे वाटते. कबीरपंथीयांमध्ये आदराचे स्थान असलेल्या *कबीर चरित बोध* या ग्रंथात कबिराचे जन्मवर्ष 1398 असल्याचे म्हटलेले आहे. तेसुध्दा सयुक्तिक वाटत नाही.

एकूण निश्चित असे एवढेच म्हणता येईल की, कबीर बहुधा पंधराव्या शतकात होऊन गेला. कबीर सिकंदर लोदीचा समकालीन होता आणि त्या दोघांची भेट झाली होती, या सर्वसाधारण समजुतीशीही हे जुळणारे आहे. ब्रिग्जच्या म्हणण्यानुसार सिकंदर लोदीचे 1494 मध्ये काशीत आगमन झाले होते. भारताच्या पुरातत्त्व खात्याचा अहवाल सांगतो, की बिजलीखांने 1450 मध्ये आमी नदीच्या किनाऱ्यावर कबीरशाह याची कबर बांधली होती. पण डॉ. रामकुमार वर्मा म्हणतात की, बिजलीखांने कबर नाही तर कबिराच्या स्मरणार्थ एक इमारत बांधली होती. शिवाय त्यांच्या मते पुरातत्त्व खात्याच्या सर्वेक्षण अहवालात दिलेले सालसुध्दा निव्वळ अंदाज आहे.

रामानंद हे कबिराचे गुरू होते असे सामान्यत: मानले जाते. परंतु डॉ. भांडारकर आणि डॉ. मोहनसिंह यांना हे मान्य नाही. रामानंदांचे जन्मसाल 1298 असल्याचे ग्रिअर्सन सांगतो तर फर्कुहर आणि केई, ते 1400 व 1470 च्या दरम्यान असल्याचे मानतात. सर्व उपलब्ध सामग्रीची पडताळणी करून डॉ. गोविंद त्रिगुणायत यांनी असा निष्कर्ष काढला आहे की कबिराचा जन्म 1398 साली झाला होता.[1] एकूणच असे परस्परविरोधी मतप्रवाह पाहिल्यावर वाटते की याबाबतीत कुठलाही पूर्वग्रह बाळगणे काही योग्य ठरणार नाही.

एका काझीने कुराण उघडून जो शब्द निवडला ते नाव कबिराला दिले गेले. अरेबिक भाषेत 'कबीर' म्हणजे 'महान'. कबिराने आपल्या एका दोह्यात म्हटले आहे -

1. *कबीर की विचारधारा*: गोविंद त्रिगुणायत, दुसरी आवृत्ती, पृ. 24

कबिरा तूचि कबिरू नाम तुझे कबीर
रामरत्न लाभेल जेव्हा त्यजशील आधी शरीर [1]

कबिराच्या जन्मस्थळाबाबतसुद्धा तीन मतप्रवाह आहेत : मगहर, काशी आणि आझमगढमधील बेलहरा गाव. मगहरच्या बाजूचे प्रतिपादन असे आहे की, कबीर आपल्या रचनांमध्ये त्याचा उल्लेख करतो. कबिराने लिहून ठेवलेले आहे की काशी पाहण्याआधी त्याने मगहरचे दर्शन घेतले, तसेच अखेरच्या दिवसांत तो पुन्हा मगहरला परतला. मगहर काशीच्या (आजचे बनारस किंवा वाराणशी) जवळ आहे आणि तिथे कबिराची पूर्वोल्लेखित कबर आहे.

कबिराचे सर्व आयुष्य, तो स्वत:चे 'काशीचा विणकर' असे वर्णन करतो त्याप्रमाणे मुख्यत: काशीतच व्यतीत झाले हे खरे आहे. अनेक कबीरपंथीय ग्रंथांनासुद्धा सर्वसामान्यांचा विश्वास असलेली ही गोष्ट मान्य आहे. पण कबिराचा जन्मसुद्धा काशीत झाला होता, याला मात्र कसलाही आधार आढळत नाही. 'बनारस गॅझेट' मध्ये त्याचा जन्म बेलहरा गावी झाल्याची जी नोंद आहे, ती बहुधा कबीर लहरतारा तलावात सापडल्याचा जो लोकप्रिय समज आहे त्यातून आलेली असावी. पण या समजाला पुष्टी देणारा कसलाही विश्वसनीय पुरावा सापडत नाही. आझमगढ जिल्ह्यात कबीर, त्याचा पंथ किंवा त्याचे अनुयायी यांच्या संबंधाने कसलेही स्मारक आढळत नाही.

कबिराचे आईवडील आणि त्याची जात यांबद्दलसुद्धा अनेक मते आहेत. कबीर दैवी प्रकाशातून जन्माला आला किंवा लहरतारा तलावात एका पूर्ण उमललेल्या कमळावर सापडला, असल्या चमत्कृतीपूर्ण कथा सोडून दिल्या तरी दोन संभाव्य कथा उरतात. एका कथेनुसार तो एका ब्रांम्हण विधवेच्या पोटी (पिता अज्ञात) जन्माला आला, तिने त्याला सोडून दिले आणि नीरु व नीमा या मुस्लिम विणकर दांपत्याने त्याला उचलून घरी नेले. दुसऱ्या कथेनुसार तो या विणकर दांपत्याचाच पुत्र होता. कबिराच्या काव्यात या संबंधाने एवढाच उल्लेख आढळतो की, तो लहान असतानाच त्याच्या मातापित्यांचे निधन झाले होते.त्याच्या जातीबाबत तीन सिद्धांत प्रचलित आहेत. आपल्या रचनांमध्ये कबिराने स्वत:ला 'जुलाहा' आणि 'कोरी' म्हटलेले आहे. जुलाहा म्हणजे विणकर. वाराणशीतील बहुतेक विणकर मुस्लिम आहेत. कोरी हीदेखील एक प्रकारची विणकर जात आहे आणि उत्तर प्रदेशात ती खालच्या दर्जाची समजली जाते. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदींच्या मते कबीर 'जुगी' किंवा 'जोगी' जातीचा होता. (कबीर स्वत:च्या वडिलांचा 'गोसाई' असा उल्लेख करतो.) जुगी किंवा जोगी हे इस्लाम धर्माचा स्वीकार केलेले विणकर होते. ते नाथपंथी म्हटल्या जाणाऱ्या जातिबंधनमुक्त भटक्या बैरागी साधूंचे अनुयायी होते. भारतात मुस्लिम राजवटीची स्थापना झाल्यानंतर त्यांच्यापैकी अनेकांनी इस्लाम धर्म स्वीकारला. पण त्यांचे पूर्वीचे आचारविचार तसेच राहिले. आपल्या या मांडणीच्या पुष्ट्यर्थ डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी पुढीलप्रमाणे युक्तिवाद करतात : कबिराने

1. कबिरा तू ही कबिरू तू तोरे नाम कबीर।
रामरतन तब पाइये जद् पहिले तज शरीर ।।
- *कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 262



स्वत:ला जुलाहा म्हटलेले आहे, पण कुठेही त्याने स्वत:चा मुस्लिम असा उल्लेख केलेला नाही. ज्या ज्या वेळी तो स्वत:ला 'ना हिंदू ना मुस्लिम' असे संबोधतो, त्या त्या वेळी तो चारही वर्णांपेक्षा खालच्या जातीचा उल्लेख करताना दिसतो. आपल्या एका पदात तर कबिराने जोगी, हिंदू आणि मुस्लिम हे एकमेकांपासून संपूर्णतया भिन्न जातिसमूह असल्याचे म्हटलेले आहे-

जोगी करी गोरख-गोरख, हिंदू रामनाम उच्चारी
मुसलमान म्हणे एक खुदा
घट-घट सामावून राही कबिराचा स्वामी [1]

कबिराच्या मृत्यूनंतर त्याचे हिंदू व मुस्लिम अनुयायी आणि शिष्य त्याच्या अंतिम संस्कारांसाठी एकमेकांशी भांडू लागले अशी एक आख्यायिका आहे. हिंदूंना दहनविधी हवा होता तर मुस्लिमांना दफन करायचे होते. (कहाणीनुसार त्याच्या मृतदेहाचे फुलांमध्ये रूपांतर झाले आणि ती फुले नंतर दोघांनी आपापसांत वाटून घेतली). ही कथा, तसेच त्याला रामानंद आणि शेख तकी हे दोन गुरू होते, अशा प्रकारच्या गोष्टींवरून कबीर कुठल्याही एका धर्माच्या सनातनी परंपरेत वाढलेला नव्हता, या सिद्धांताला पुष्टी मिळते.

तो पूर्ण विचारांती परंपरा-विरोधक बनला होता आणि म्हणूनच दोन्ही धर्मांमधील दुराग्रहांवर तो टीका करू शकला. तसेच एका अलौकिक पातळीवरून एका परमतत्त्वाची कल्पना करू शकला.

कबिराचे शिक्षण आणि त्याची गुरू-परंपरा यांबाबतसुद्धा अनेक अनुमाने आहेत. तो कुठल्याही पाठशाळेत गेला नव्हता. तसेच भाषा, तत्त्वज्ञान किंवा वस्त्र विणण्याचे तंत्र या गोष्टींचे त्याने रीतसर शिक्षण घेतले नव्हते, हे मत सर्वमान्य आहे. डॉ. मोहनसिंहांच्या मते कबीर 'गुरू' हा शब्द ईश्वर या अर्थाने वापरतो. आध्यात्मिक व पारलौकिक क्षेत्रांत त्याला कोणी गुरू किंवा आचार्य नव्हता. म्हणून तर त्याला 'निगुरा' म्हणजे 'गुरू नसलेला', असे म्हटले गेले आहे. त्याचे तत्त्वचिंतन हे प्रामुख्याने सहजस्फूर्त आहे तर त्याचे आध्यात्मिक अवगाहन साधनेतून आलेले आहे. परंतु माल्कम, वेस्टकॉट आणि डॉ. आर.एस.त्रिपाठी यांचे मत असे आहे की, शेख तकी हे कबिराचे गुरू होते. गुलाम सरवरसुध्दा त्यांच्या *खजनतुल आसफिया* मध्ये असेच म्हणतात.

कबिराच्या रचनांचा सुफी रचनांशी प्रत्यक्ष संबंध दिसून येत नसला तरी त्यांवर सुफी विचारधारेचा निश्चितच खोल असा प्रभाव आहे. रामानंदांबरोबरच्या त्याच्या संबंधाबद्दलसुद्धा असेच म्हणता येईल. कारण कबीर जरी 'माझे गुरू बनारसमध्ये आहेत' एवढेच विधान करत

1. जोगी गोरख गोरख करै, हिन्दू रामनाम उच्चरै।
मुसलमान कहे एक खुदाइ
कबिरा कौ स्वामी घट-घट रह्यौ समाइ ।।
-कित्ता, पृ. 200

असला आणि रामानंदांचा प्रत्यक्ष उल्लेख करत नसला, तरी रामानंदांच्या आणि त्याच्या उपदेशात कमालीचे साधर्म्य दिसून येते. *दबिस्तान-ए-तवारीख*चे लेखक मोहसीन फानी, *भक्तमाल* लिहिणारे नाभादास आणि *भक्तमाल*चे भाष्यकार प्रियादास हे सर्वजण रामानंद हेच कबिराचे गुरू होते, असे मानतात.

कबिराचे कौटुंबिक जीवन सुखी होते असे दिसत नाही. कबीर एक अथक साधक असला तरी त्याने लौकिक जीवनाचा त्याग केलेला नव्हता. कुटुंबियांच्या पालन-पोषणासाठी तो कष्टही करत होता. अनेक आख्यायिकांनुसार लोई ही त्याची पत्नी होती. तिच्या आईवडिलांची काहीही माहिती मिळत नाही. त्यांचा विवाह कुठे व कशाप्रकारे झाला हेसुध्दा रहस्यात अवगुंठित आहे. कबिराच्या काव्यात आढळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करून डॉ. रामकुमार वर्मांनी असा निष्कर्ष काढला आहे की कबिराला दोन भार्या होत्या. एक साधारण दिसणारी तर दुसरी रूपवती होती. दुसऱ्या पत्नीचे नाव धनिया किंवा रामजनिया होते. रामजनिया हा शब्द सर्वसाधारणपणे नर्तकींसाठी वापरण्यात येणारा एक सौम्य शब्द असल्याने डॉ. रामकुमार वर्मा सुचवतात की कबिराची दुसरी पत्नी बहुधा नर्तकी होती. कबीरपंथीयांना साहजिकच हा निष्कर्ष मान्य नाही. ते या सिद्धांताला विरोध करतात.

परंतु कबिराला कमाल नावाचा एक पुत्र होता आणि कमाली नावाची कन्या होती, हे मात्र सर्वांना मान्य आहे. असेही म्हटले जाते की, कबीरपत्नी लोई आणि पुत्र कमाल यांना कबिराचा पारलौकिक साधनेचा मार्ग पसंत नव्हता. कबिराच्या रचनांमध्ये याचा भरपूर पुरावा आढळतो. पत्नीबद्दल लिहिताना तो 'कुरूपी, कुजाती, कुलक्षणी' यांसारख्या कटू शब्दांचा वापर करताना दिसतो. कबीरपत्नीही तक्रार करताना दिसते की, तिची खाण्याची आबाळ होत असताना, तिचा पती मात्र अनेक साधूंना अतिथी म्हणून घरी घेऊन येत असतो.

कबीर वंशपरंपरेने जरी विणकर होता तरी एक कौशल्य म्हणून किंवा उपजीविकेचा एक मार्ग म्हणून, दोन्ही प्रकारे त्याचे मन या व्यवसायात मुळीच रमत नव्हते. त्याच्या काव्यात चरखा, माग, धोटा, ताणे-बाणे, चादर यांसारखे त्याच्या व्यवसायातील शब्द रूपकार्थाने येत असले तरी प्रत्यक्षात त्याचे सूत तात्त्विक विणकामाशीच जास्त जुळलेले होते. त्याचे ध्यान गिऱ्हाईकापेक्षा ईश्वरसाधनेकडे जास्त लागलेले होते.

कबिराने त्यागिले सर्व विणकाम
देहावर लिहविले हरीचे नाम[1]

कबीर एक विपुल प्रवास केलेला संत आहे. त्याच्या एका भजनात तो म्हणतो, 'मी अनेकदा हाज व मक्केला जाऊन आलो आहे.' पण त्याने खरोखरीच या यात्रा केल्या होत्या, की आपल्या विरोधकांना निरूत्तर करण्याच्या हेतूने केलेली ही काव्यमय, प्रतिकात्मक अशी गूढोक्ती वा

1. तनना बुनना ,सभु तज्यौं है कबीर।
हरि का नाम लिखि लियौं सरीर।।
- *कबीर वाङ्मय* : (सं.) जयदेवसिंह, वासुदेवसिंह, पृ. 139



अतिशयोक्ती होती हे निश्चित सांगता येणार नाही. मात्र तीर्थाटनाच्या निमित्ताने कबीर नक्कीच भारतभर फिरला होता, हे अनेक उल्लेखांवरून सिद्ध होते. आचार्य क्षितिमोहन सेन यांनी त्याच्या गुजरातयात्रेचा उल्लेख केलेला आहे. तो रतनपूर येथे गेला होता असा उल्लेख *खुलासातुत्तवारीख* मध्ये आढळतो. *आदिग्रंथ*मधील एका पदात गोमतीच्या किनाऱ्यावर परिक्रमा करताना त्याची पीतांबर पीर या मुस्लिम सिद्धपुरुषाशी भेट झाल्याचे कबीर सांगतो -

गोमतीच्या तीरी अमुचे हाज
पीतांबर पीराचा जिथे निवास[1]

*आईन-ए-अकबरी* नुसार कबिराने ओरीसातील जगन्नाथपुरीला भेट दिली होती, तर *अ हिस्ट्री ऑफ मराठा पीपल* या ग्रंथात तो दक्षिण महाराष्ट्रात पंढरपूरपर्यंत जाऊन आल्याची नोंद आहे. कबीरपंथीयांमध्ये लोकप्रिय असलेल्या *कबीर मन्सूर* या ग्रंथात कबिराच्या बगदाद, समरकंद आणि बोखारा या शहरांच्या भेटीचे वर्णन आहे. परंतु यात ऐतिहासिक सत्यापेक्षा कल्पिताची शक्यताच अधिक आहे. ही ऐतिहासिक स्थळे प्रसिद्ध सुफी संतांशी संबंधित असल्याने कबीर तिथे गेलेला असणारच, असे समजणे उचित मानले गेले असावे.

कबिराला त्याच्या आयुष्यभरात कसलाही सन्मान मिळाला नाही. तथाकथित खालच्या जातीत जन्मल्याने त्याची उपेक्षा तर झालीच, शिवाय उपदेशकाची भूमिका घेतल्याबद्दल त्याचा उपहास केला गेला. त्याला शारीरिक दंडही सोसावा लागला. त्याच्या अनेक पदांवरून असे दिसून येते की काही लोकांनी त्याला साखळदंडांनी बांधून, त्याचे दोन्ही हात पाठीवर बांधून त्याला मारहाण केली. एका आख्यायिकेनुसार सिकंदर लोदीनेसुद्धा त्याचा छळ केला होता. अनंतदासाच्या *परचै* मध्ये (परिचय) त्याचा उल्लेख आलेला आहे. जी. एच. वेस्टकॉट यांनी त्यांच्या *कबीर ॲण्ड द कबीर पंथ* या ग्रंथात हिंदू व मुस्लिम या दोघांनी कबिराची कशी दुहेरी छळणूक केली, त्याचे वर्णन या शब्दांत केले आहे :

'कबिराचा स्पष्टवक्तेपणा आणि सामाजिक रूढींविषयीचा त्याचा अनादर यांमुळे चारी बाजूंना त्याला शत्रू निर्माण झाले. कबीरपंथीयांच्या म्हणण्यानुसार मुसलमानांतर्फे विरोधी सूर काढणारे शेख तकी हे होते. हा प्रसिद्ध पीर बादशहा सिकंदर लोदीसमोर जाऊन उभा राहिला आणि त्याने कबिराविरुद्ध तक्रार केली की तो स्वत:ला दैवी सिद्धी प्राप्त असल्याचा दावा करत आहे. या अपराधासाठी कबिराला मृत्युदंडाची शिक्षा दिली जावी अशी शेख तकींनी मागणी केली. बादशहाने कबिराला कैद करून दरबारात हजर करावे असे फर्मान काढले आणि त्यासाठी आपले सैनिक पाठवले. बादशहाचे सैनिक संध्याकाळपर्यंत कबिराचे मन आपल्यासोबत येण्यासाठी वळवू शकले नाहीत. संध्याकाळी कबीर बादशहासमोर काही न बोलता उभा राहिला. काझी ओरडून म्हणाला, ''तू बादशहाला सलाम का करत नाहीस, काफीर?'' कबीर शांतपणे म्हणाला, ''जे दुसऱ्याचे दु:ख जाणू शकतात तेच पीर असतात, बाकी सर्वच काफीर.''

1. हज्ज हमारी गोमती तीर, जहाँ बसहि पीतंबर पीर
- *कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 330

बादशहाने त्याला विचारले की त्याने सकाळीच दरबारात हजर होण्याचा हुकूम दिलेला असताना कबीर संध्याकाळपर्यंत का थांबून राहिला? तेव्हा कबीर म्हणाला की, त्याने पाहिलेल्या एका दृश्याने त्याला खिळवून ठेवले होते.माझ्या हुकुमाची बेअदबी करण्याइतके महत्त्वाचे असे कुठले दृश्य, अशी बादशहाने पृच्छा केल्यावर कबीर म्हणाला की त्याने सुईच्या नेढ्यापेक्षा बारीक अशा मार्गावरून उंटांचा तांडा जाताना पाहिला. यावर बादशहा म्हणाला की तो खोटे बोलत आहे. तेव्हा कबीर म्हणाला, ''हे बादशहा, स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यात केवढे प्रचंड अंतर आहे याची कल्पना कर. सूर्य आणि चंद्र यांच्यामधील अवकाशात तर अगणित हत्ती आणि उंट मावू शकतील. आणि हे सर्व आपण सुईच्या नेढ्यापेक्षा बारीक असलेल्या डोळ्यांमधल्या बाहुलीच्या छिद्रातून पाहू शकतो.'' हे ऐकल्यावर बादशहाचे समाधान झाले आणि त्याने कबिराला सोडून दिले.'

सनातनी ब्राह्मणांनी कबिराला पाखंडी ठरवले आणि एका वाईट चालीच्या बाईशी त्याची जवळीक असल्याच्या अफवा पसरवल्या. या गोष्टीसाठी बादशहाने त्याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. त्यानुसार त्याला साखळदंडांनी बांधून एका दगडांनी भरलेल्या नावेत बसवून ती नाव सोडून दिली गेली. नाव बुडाली, पण कबीर व्याघ्रचर्मावर बसलेल्या एका मुलाच्या रूपात वर येऊन प्रवाहाबरोबर वाहत जाऊ लागला. त्याला पुन्हा पकडून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला गेला पण तोही अयशस्वी ठरला. आता त्याच्यावर जादूटोणा करत असल्याचा आरोप ठेवण्यात आला आणि एका उन्मत्त हत्तीच्या पायाखाली तुडवून मारण्याची शिक्षा फर्मावण्यात आली. परंतु कबीर व हत्ती यांच्यामध्ये एक सिंह प्रकट झाला आणि त्याला पाहून हत्ती घाबरून पळून गेला. कबिराच्या बाबतीत अशा असंख्य आख्यायिका प्रचलित आहेत. यांतील काही त्याच्या शिष्यांनी आणि अनुयायांनी लिहिलेल्या ग्रंथांत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

कबिराच्या मृत्युवर्षाबाबतसुद्धा चार वेगवेगळी मते आहेत. काहीजण म्हणतात1447 काही 1511, तर काही 1517. अनंतदास मानतात की कबिराला 120 वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. धर्मदास यांनी कबिराच्या जीवनकाळातच त्याच्या पदांचा संग्रह करण्यास सुरुवात केली होती आणि त्यांच्या पहिल्या पूर्ण संग्रहाचे वर्ष 1463 मानले जाते. डॉ. श्यामसुंदर दास यांच्या मतानुसार कबिराचे 1517 मध्ये निधन झाले. सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी आपल्या *इंडियन एम्पायर* (1892) या ग्रंथात कबिराचा जीवनकाळ 1380 ते 1420 असा दिलेला आहे, तर डॉ. हरप्रसाद शास्त्रींच्या मते तो 1398 ते 1518 असा आहे.

तर अशी होती ही आख्यायिकाच बनलेल्या एका अलौकिक जीवनगाथेची निव्वळ रूपरेषा. कबिराच्या काव्याचा आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा हिंदी साहित्यावरच नव्हे, तर उत्तर भारतातल्या सर्वसाधारण लोकजीवनावर गेली कित्येक शतके जो खोल असा प्रभाव आहे तो लक्षात घेता, ही रूपरेषा नि:संशय अस्पष्ट आणि असमाधानकारक आहे. कबीर हा हिंदी साहित्याच्या आरंभकाळातील सर्वश्रेष्ठ कवी व गूढवादी होता यात शंकाच नाही. बिशप



वेस्टकॉट यांच्या 1907 साली प्रसिध्द झालेल्या कबिरावरच्या इंग्रजी ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत प्रकाशकांनी जे टिपण लिहिले आहे त्यात म्हटले आहे की, ' कबीर हा पंधराव्या शतकातला भारतीय ल्यूथर होता. त्याला हिंदीतील धर्मपर साहित्याचा जनक म्हणता येईल. त्याने व त्याच्या अनुयायांनी, मूर्तिपूजेचा तिटकारा करणाऱ्या इस्लामचा एकेश्वरवाद आणि हिंदू परंपरा, या दोहोंमध्ये जे काही उत्तम होते त्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्म व इस्लाम यांमधील सर्वांत उत्तम तत्त्वांचा संयोग करून, राजा राममोहन राय यांनी नंतरच्या काळात केला त्याप्रमाणे, एक समन्वयवादी पंथ निर्माण करण्याचा त्याने प्रयत्न केला. उपनिषदांतील अद्वैतवाद हा त्याच्या शिकवणुकीचा पाया होता. तो एक थोर गायक होता, अवधूत होता, अद्वैतवादी होता.'

कबिराची अनेक चित्रे उपलब्ध आहेत, पण त्यांतले कुठलेही समकालीन असल्याचे दिसत नाही. ही एक विचित्र बाब आहे की, भारतातील प्राचीन किंवा मध्ययुगीन श्रेष्ठ कवी किंवा साहित्यिक यांच्यापैकी अतिशय कमी व्यक्तींची अस्सल चित्रे किंवा व्यक्तिशिल्पे आढळतात. कालिदास असो का ज्ञानेश्वर, तिरुवल्लुवर असो का नामदेव, चैतन्य असो का जयदेव, कोणाचेही समकालीन चित्र सापडत नाही. यामुळे ब्रिटिश म्युझियममध्ये सुरक्षित ठेवलेले सर्वांत जुने असे जे कबिराचे चित्र आहे त्यावरच समाधान मानावे लागते. कलकत्ता म्युझियममध्ये असलेले चित्र म्हणजे या मूळ चित्राची प्रतिकृती असावी. ब्रिटिश म्युझियममधील चित्र हे सतराव्या शतकातील मुघल शैलीतले लघुचित्र आहे. या चित्रात हा संतकवी उघडया अंगाने मागावर बसला आहे. त्याच्या गळ्यात आजही भक्तगण घालतात तसली मण्यांची माळ आहे. दोन्ही बाजूंना दोन शिष्य आहेत. एकाच्या गळ्यात हार आहे. दुसरा शिष्य मुस्लिम वाटतो आणि त्याच्या हातात एक वाद्य आहे. या चित्रातील कबिराला दाढी नाही. गुरू अर्जुनदेव-गुरुद्वारात दुसरे एक चित्र आहे. त्यातही कबीर त्याच्या मागावर विणीत आहे, पण त्याला दाढी आहे.बनारसमधील 'कबीर चौरा' या मठातील चित्रांमधला; तसेच *रामानंद से रामतीर्थ* आणि *कबीर वचनावली* या ग्रंथांमध्ये छापलेल्या चित्रांमधला कबीर हा सुफी संत दाखवलेला आहे. त्याच्या हातात एक मण्यांची जपमाळ आहे आणि डोक्यावर फकिरासारखी त्रिकोणी टोपी आहे. त्याचे कान टोचलेले आहेत आणि त्यांमध्ये नाथपंथी जोग्यांसारखी गोल कुंडले आहेत. पुण्याच्या चित्रशाळा प्रेसने प्रकाशित केलेले चित्र फार नंतरचे आहे आणि त्यात कबीर हिंदू साधूच्या रूपात दाखवलेला आहे. एकूण कबीर खरोखर दिसायला कसा होता यासंबंधी, तसेच त्याचे रूप, त्याची ठेवण, त्याचा वेश आदी गोष्टींबाबत या सर्व चित्रांमधून काहीही अनुमान काढता येत नाही. कदाचित निर्गुण निराकार ईश्वराला मानणारा कबीर स्वत:च ' एक दृश्य रूप नसलेले नाव' म्हणून उरावा, त्याचे सुस्पष्ट असे ओळखचित्र असू नये, हेसुद्धा एकप्रकारे सुसंगतच मानावे लागेल.

आता या ठिकाणी कबिराच्या चरित्रासंबंधी सामग्री जिथे उपलब्ध आहे त्या स्रोतांचा उल्लेख करणे उचित ठरेल. कबिराचा पहिला उल्लेख नाभादासरचित *भक्तमाल*मध्ये सापडतो. *भक्तमाल*मध्ये अनेक संतांच्या जीवनातील, तसेच त्यांच्या चमत्कारांच्याही गोष्टी आहेत आणि

त्याचा रचनाकाळ इ.स. 1500 मानला जातो. यात कबिराबद्दलची जी दोन पदे आहेत त्यांवरून केवळ एवढीच माहिती मिळते की कबीर हा रामानंदांचा शिष्य होता. प्रियादास यांनी या ग्रंथांवर जे भाष्यात्मक लिखाण केले आहे त्यातसुद्धा या माहितीला दुजोरा दिला आहे. शिवाय असेही म्हटले आहे की कबीर हा एका हिंदू ब्राह्मण विधवेचा पुत्र होता आणि नीरु व नीमा या दांपत्याने त्याला वाढवले. हा ग्रंथ आणखी असेही सांगतो की कबीर हा सिकंदर लोदीचा समकालीन होता. संत रोहिदास, गरीबदास, धर्मदास, पीपा आणि तुकाराम यांच्या रचनांमध्येही कबिराचे उल्लेख आढळतात.गुरू ग्रंथसाहेब या शिखांच्या धर्मग्रंथात असे अनेक 'सलोक' आणि 'राग' आहेत जे कबीर-रचित आहेत असे मानले जाते. गुरू नानकांच्या काही पदांमध्येही कबिराचा नामोल्लेख आहे. बहुधा 1600 मध्ये लिहिल्या गेलेल्या अनंतदासांच्या *परचै*नुसार : 'कबीर हा काशीचा विणकर होता व रामानंदांचा शिष्य होता, तो बघेरचा राजा वीरसिंह याचा समकालीन होता, त्याला सिकंदर लोदीच्या छळणुकीची शिकार व्हावे लागले आणि तो 120 वर्षांचे आयुष्य लाभलेला असा संत होता.'

काही फारसी व उर्दू ग्रंथांमध्येसुद्धा कबिराचे नामोल्लेख व त्याच्या जीवनातील काही आख्यायिका वाचायला मिळतात.मौलवी गुलाम सरवर यांच्या *खजनतुल आसफिया*चा उल्लेख यापूर्वी आलेलाच आहे. मोहसिन फानी यांच्या *दबिस्तान-ए-मजाहिब* आणि मौलवी नासिरुद्दीन यांच्या *तजक्कुरुल फुकरा* यांमध्ये कबीर हा रामानंदांचा शिष्य होता अशीच नोंद आहे. *आईन-ए-अकबरी* मध्ये कबिराच्या समाधीबाबतच्या मतभेदांबद्दल माहिती दिली आहे : काही ती अयोध्या जिल्ह्यातील रतनपूर येथे असल्याचे मानतात, तर काहींच्या मते ती पुरी येथे आहे. ग्रंथकार पुरीच्या पक्षाचे आहेत.

*कबीर ॲण्ड द कबीर पंथ* या आपल्या ग्रंथात वेस्टकोट यांनी विविध ऐतिहासिक ग्रंथांतून 'कबीर' या नावाने उल्लेख झालेल्या, भिन्न कालावधीतल्या अकरा वेगवेगळ्या संतांची माहिती दिली आहे : 1554 साली गुजरातमध्ये मृत्यू पावलेले नागोरचे कबीर चिश्ती; मुसलमान ज्यांना 'पीर कबीर' म्हणत आणि हिंदू 'भगत कबीर', ते 1594 साली मरण पावलेले शेख कबीर जुलाहा; बोखाराला भेट दिलेले, 1229 साली मृत्यू पावलेले ख्वाजा औलिया कबीर; सय्यद कबीर-उद्-दीन हसन, जे1490 साली बल्खमध्ये मरण पावले; बजोरात वास्तव्य असलेले व अफू सेवन करणारे शेख कबीर; 1539 साली निधन झालेले शेख अब्दुल कबीर किंवा बालापीर; मुलतानचे शेख कबीर जे बल्खला जाऊन हिंदुस्थानात परत आले, अकबरासोबत फिरले आणि 1585 साली फतेपूरला मरण पावले; 1379 साली काश्मीरला गेलेले आणि पाच वर्षांनंतर तिथेच मरण पावलेले अमीर कबीर मीर सय्यद अली हमदानी; सय्यद जलालुद्दीनचे पिता सय्यद अहमद कबीर; 1421 साली मरण पावलेले सय्यद जलालुद्दीनचे नातू कबीर-उल-दीन इस्माइल; आणि ज्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हुमायूनच्या काळात जौनपूरमध्ये एक मशीद बांधली गेली होती ते दिवाणशाह कबीर.

*खजनतुल आसफिया* मध्ये पहिल्या पाचांचा उल्लेख आहे, *सैर-उल-अकताब* मध्ये सहाव्या कबिराचा, *मुकुखुल-उल-तवारीख* मध्ये सातव्याचा, आठव्याचा *अखबार-उल-अखयार* मध्ये



आणि उरलेल्यांचा *फरिश्ता* मध्ये.

इतिहासज्ञ व साहित्य-समीक्षक यांच्यात कबिराच्या केवळ बाह्यरूपाबाबत किंवा तारखांबाबतच विपुल मतभेद आहेत असे नाही, तर त्याच्या कृती व त्याची श्रध्दासूत्रे यांबाबतही परस्परविरोधी मतप्रवाह आहेत. तरीही, खाली दिलेला त्याच्या धर्मश्रध्दांचा गोषवारा हा साधारणत: अधिक मान्यता असलेला असा म्हणता येईल.

कबिरावर उपनिषदांमधील अद्वैतवादाचा आणि इस्लाममधील एकेश्वरवादाचा प्रभाव आहे. पण तो कबिराच्या स्वत:च्या वैशिष्ट्यांनिशी आलेला आहे. कबिराचा देव असा आहे-

नाही वदन नाही भाळ, नाही रूपक रूप
पुष्पसुवासाहून नाजूक, ऐसा तू अनूप [1]

याव्यतिरिक्त कबिरावर वैष्णव भक्तीचाही खोल असा प्रभाव आहे. त्याचप्रमाणे त्याच्या अनेक पदांत परमात्मा व जीवात्मा यांचे संबंध सुफी रंगात व्यक्त झाले आहेत. इतर अनेक पदांमध्ये तो तांत्रिक, सिद्ध आणि नाथपंथी योगी यांची विशिष्ट शब्दप्रणालीही वापरतो. काही पदांत तो अनेक प्रकारचे प्रभाव आपल्यात सामावून घेणारा गांवढळ 'सहजिया' आहे. काही ठिकाणी तर खेड्यातील निष्कपट व साध्याभोळ्या माणसाचा असा काही भक्तिभाव आहे की अशी पदे लोकगीते म्हणून गायली जात आहेत. उदाहरणार्थ-

कसे सरतील दिन मार्ग सांगून जा
अलीकडे गंगा पलीकडे यमुना
मधले माझे खोपट शाकारून जा
पदर फाडिला कागद बनविला
छबी तुझी हृदयी उतरवून जा
कबीर म्हणे ऐक रे साधूभाई
दंडाला धरून वाट दाखवून जा [2]

कबिराने रामानंदांच्या सगुण रामाला निर्गुण, निराकार बनवले. ज्याचे वर्णन करता येणार

1. जाके मुँह माथा नहीं, नहीं रूपक रूप
पहुप वास ते पातला ऐसा तत्त अनूप
- *कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 101

2. कैसे दिन कटिहैं जतन बताये जइयो।
एहि पार गंगा ओहि पार जमुना ॥
बिचवाँ मडइया हमको छवाये जइयो ॥
अँचरा फारिके कागज बनाइल
अपनी सुरतिया हियरे लिखाये जइयो ॥
कहत कबीर सुनो भई साधो
बहियाँ पकरिके रहिया बताये जइयो ॥
- *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 334

नाही असा राम. गीतेत म्हटल्याप्रमाणे 'जिथे शब्द हरतात आणि जिथे मन पोहोचू शकत नाही' असा. (*यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सः।*)

आणखी एका पदात कबीर ईश्वराचे शब्दाच्या रूपात वर्णन करतो -

शब्दाचा शोध घे, जाण तू शब्दाला, शब्द अन् शब्दच तू आहेस रे भाई
शब्द आकाश असे, शब्दचि पाताळ, शब्दातच पिंड अन् ब्रह्मांड राही
उक्तीत शब्द असे, श्रवणीही शब्द, मूर्ती बनवती शब्दांत कल्पुनी
शब्द ते वेद, शब्दचि नाद, शब्दचि शास्त्रे विविधरूपे गायनी
शब्दचि यंत्र, शब्द ते मंत्र, गुरूही शिष्याला शब्दचि ऐकवी
शब्दचि सार, शब्द असार, शब्द आकार, शब्द निराकारही
शब्द पुरुष असे, शब्दचि स्त्री, शब्द स्थापती तिन्ही लोकही
शब्द दृष्ट नि अदृष्ट ओंकार, शब्दचि सकल ब्रह्मांड होई
कबीर म्हणे तू पारखून घेई शब्द, शब्दचि अपुला ईश्वर रे भाई [1]

कबिराचे अध्यात्म कुठल्याही प्रकारच्या चौकटीत बसवता येणार नाही. मात्र हिंदू व मुसलमान, दोघांच्याही संकुचित दृष्टीची व धर्मवेडाची तो ज्याप्रकारे निर्भर्त्सना करतो, त्यावरून त्याला निर्भय समाजसुधारकांच्या पंक्तीत बसवता येईल. तो म्हणतो-

ऐसे असती मूर्ख, दगडा पुजण्या जाती
जात्याची का नको पूजा, ज्याचे पीठ खाती [2]

कबिराच्या विचारांत विरक्तीचा एक तीव्र स्वर आहे आणि त्यात, जग एक आसवांचा समुद्र असल्याचा भाव अंतर्निहित आहे. सर्व गोष्टी अंतिमतः मृत्यूच्या दिशेने प्रवास करतात याचे तो कायम स्मरण करून देत असतो. यामुळेच काही समीक्षकांनी बौद्धधर्म आणि कबीरपंथ यांमध्ये साम्यस्थळे शोधली आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानातील 'शून्य'सारख्या संकल्पना कबिराच्या रचनांमध्ये वारंवार येताना दिसतात. त्याच्या काही ओळी तर नागार्जुनाच्या 'शून्यकारिका'चा अनुवाद असल्यासारख्या भासतात-

भारी म्हणू तर फार घाबराल, खोटे जर हलका म्हटले
कुठे मी जाणतो रामाला, डोळां कधी ना पाहिले'[3]

कबीर सातत्याने स्वर व मौन, शब्द व निःशब्द यांदरम्यानच्या एका मधल्या स्थितीकडे

1.'शब्द को खोजि ले...' : *कबीर वचनावली* : (सं.) अयोध्यासिंह उपाध्याय 'हरिऔध', पृ.189
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र.1)

2. लोगा ऐसे बावरे, पाहन पूजन जाँय।
घर की चकिया काहे न पूजै, जेहि का पीसा खाँय ।।

3. भारी कहाँ त बहु डरो, हलका कहूँ तो झूठ।
मैं का जाणौं राम कूँ, नैनूं कबहूँ न दीठ ।।
-*कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 17



निर्देश करत असतो. उच्चवर्णियांच्या ढोंगावर टीका करताना त्याच्यात बौद्धांचा उत्साह संचारतो आणि वज्रयानियांसारखा तो जहाल होतो.

त्याच्या काही पदांवर निरंजन पंथाचाही प्रभाव आहे. तो गोरखनाथ व इतर नाथपंथी योग्यांप्रमाणे गूढ परिभाषा व शब्दप्रणाली वापरतो. शरीरातील अष्टकमळांचा उल्लेख, श्वासावरचे नियंत्रण आणि कबिराची साधनापद्धती या सर्व गोष्टी योगिक तत्त्वज्ञानावर आधारलेल्या आहेत.

कबीर सुफी होता की नाही, या विवादास्पद प्रश्नाचा विचार पुढे आपण कबिराच्या तत्त्वज्ञानासंबंधीच्या प्रकरणात करणार आहोत.

कबिराच्या रचनांचा अभ्यास करताना त्यांतील कुठल्या खरोखर त्याच्या आहेत या प्रश्नाला प्रथम तोंड द्यावे लागते. अनेक उत्साही शिष्यांनी त्याच्या नावावर कुठल्याही रचना घुसडून दिलेल्या आहेत. कबिराच्या मूळ पदांची प्रमाणित अशी एकही प्रत नसल्याने त्यांत मिसळलेली बनावट पदे निवडून वेगळी करणे, हे सोपे काम नाही. या पुस्तकाच्या शेवटी दिलेली ग्रंथसूची पाहताना ही बाब ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. हिंदी, उर्दू व पंजाबी (गुरु मुखी लिपी) या भाषांत कबीर - साहित्याचे जे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत, ते सर्व मौखिक परंपरेने मिळालेल्या सामग्रीवर आधारित आहेत. त्यांना कुठल्याही मूळ हस्तलिखित प्रतीचा आधार नाही. यामुळे एकाच पदाची वेगवेगळी रूपे पाहायला मिळतात. मुद्रण करणाऱ्यांनी या गोंधळात भरच टाकली आहे. काही जण तर भक्तिभावाने चुकीच्या छापलेल्या शब्दांचाही अर्थ शोधताना दिसतात. हे सर्व ग्रंथ अभ्यासणे म्हणजे घनदाट जंगलातून मार्ग काढण्याइतके बिकट आहे. प्रस्तुत पुस्तकासाठी श्यामसुंदर दास, 'हरिऔध', रामकुमार वर्मा आणि हजारीप्रसाद द्विवेदी यांनी हिंदीत संपादित केलेल्या कबिराच्या कृतींना प्रमाण समजून त्यांचा आधार घेतलेला आहे.

पुढील काही प्रकरणांत कबिराचे काव्य आणि हिंदी भाषा व साहित्य यांच्या विकासातील कबिराचे स्थान यांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या प्रकरणात 'गूढवादी तत्त्वज्ञानात कबिराचे योगदान' याविषयी ऊहापोह केलेला आहे. कबिराच्या रचनांमध्ये काव्य कुठे संपते व गूढवाद कुठे सुरू होतो हे सांगताही येणार नाही इतक्या बेमालूमपणे, एखाद्या कुशल विणकराप्रमाणे, या दोहोंचा मिलाफ केलेला आढळतो. कबिराने स्वतःच्या हातांनी काहीच लिहून ठेवलेले नाही. तो फक्त त्याच्या अंतर्दृष्टीला जे दिसले- जे जाणवले, ते बोलत राहिला- गात राहिला. त्याच्या वाणीची घराघरांतून, येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी, सूत्रे झाली. कविता मंत्रासारखी भारून टाकू शकते याचे हे उदाहरण होते. कबिराने त्याचा आत्माच त्याच्या सूत्रमय दोह्यांमध्ये ओतला होता. प्रत्येक दोहा त्याच्या जीवनानुभवाचे सारतत्त्व बनला होता.

□□□

## 2
# तत्त्वज्ञान

'सत्य एकच आहे.विद्वज्जन ते वेगवेगळ्या तऱ्हांनी मांडतात', असे ऋग्वेदकालीन ऋषींनी म्हणून ठेवले आहे. श्वेताश्वेतर उपनिषदात म्हटले आहे, 'तिळाच्या दाण्यात जसे तेल, दुधात जसे लोणी, नदीच्या खोऱ्यात पाणी, लाकडात जसा अग्नी तसाच 'स्व' आत्म्याच्या आत वसलेला असतो. त्याला सत्याचरणातून व ध्यानचिंतनातून जाणा.' सुफी कवी जलालुद्दीन रुमी (मृत्यू 1273) आपल्या 'मसनवी'त 'एका सच्च्या प्रकाशा'बद्दल लिहितात-

दिवे वेगवेगळे आहेत पण प्रकाश एकच आहे
तो येत आहे पलीकडून

तू जर दिव्यांकडेच पाहत राहिलास तर हरवून जाशील
का की त्यांच्यामुळेच निर्माण होतो आभास
संख्येचा आणि अनेकतेचा

खिळू दे दृष्टी प्रकाशावर, की तू मुक्त होशील
या सीमित शरीराच्या अंतर्निहित द्वंद्वापासून
अरे, तू या अस्तित्वाचे केंद्र आहेस
मुस्लिम, पारशी, यहुदी हे सारे भेद
स्थानपरत्वे दृष्टिभेद आहेत

कबिराचा गूढवाद वेदांतींच्या किंवा सुफींच्या गूढवादाच्या धर्तीचा, त्याच कोटीचा होता. त्याच्या मनात 'सांत-अनंत'असले द्वंद्व नव्हते. रवीन्द्रनाथ टागोरांनी त्यांच्या *वन हंड्रेड पोएम्स ऑफ कबीर* या पुस्तकात कबिराच्या पदांचा इंग्रजीत जो अनुवाद केलेला आहे, त्यातील दोन पदांवरून हे उत्तम रीतीने दिसून येते -

असे आहे की आहे तसे, हे रहस्य कसे वर्णू हो
आत म्हणू तर विश्व रूसे, बाहेर म्हणू तर खोटे हो
आत-बाहेर सकल निरंतर, जड-चेतन अधिष्ठाने हो
दृष्टीत ना मुठीत, प्रगट-अप्रगट, शब्दांत काही ना मावे हो[1]

1. ऐसा लो नहि तैसा लो, केहि विधी कहौ गंभीरा लो।
भीतर कहूँ तो जगमग लाजे, बाहर कहूँ तो झूठा लो ॥
बाहर भीतर सकल निरंतर, चित्त अचित दोउ पीठा लो।
दृष्टी न मुष्टी परगट अगोचर, बातन कहा न जाई हो ॥
- *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 238



दुसऱ्या पदात कबीर म्हणतो-

अदृष्ट दर्शवी ब्रह्म, साधू, स्वत:स ते जव प्रगट करी
बीजात जैसा वृक्ष दिसे, वृक्षामध्ये जशी सावली

जसे नभात शून्य दिसे, अगणित शून्यातच आकार
अनंतापलिकडून अनंत तसे, अनंतातून सीमिताचा विस्तार

सूर्यामध्ये किरण जसे, किरणांमध्ये दिसे प्रकाश
परमात्म्यात तसा जीव, आणि जीवामध्ये श्वास

श्वासामध्ये शब्द दिसे, शब्दातून अर्थाची वस्ती
ब्रह्मात जीव, जीवात मन, भिन्न असून सदा भेटती

तेचि असे बीज-वृक्ष-अंकुर, तेचि असे फुल-फळ-माया
तेचि रवि-किरण-प्रकाश, तेचि ब्रह्म-जीव, ते माया

तेचि शून्य आकाश अनंत, तेचि श्वास अन् शब्द-अर्थही
अनंतपार-सांत-अनंत, सामावी ते मन-जीव-ब्रह्मही

आत्म्यामध्ये परमात्मा, परमात्म्यात आभास दिसे
आभासात प्रतिबिंब, कबीर-स्वामी पाहतसे[1]

कबिराचे गूढवादी तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी तीन तत्त्वांचा वेध घ्यावा लागेल : ब्रह्म, आत्मा आणि माया.

कबीर ब्रह्माला मूलतत्त्व किंवा सारतत्त्व मानतो. हे ब्रह्म काल, अवकाश व गुणविशेष या सर्वांच्या पार आहे. कुठल्याही परिवर्तनाचा त्यावर परिणाम होत नाही. ब्रह्म मुक्त आहे, ते अंतिम तत्त्व आहे. ते परम आहे, कार्यकारणभावाच्या पार आहे - 'ते ना डावीकडे आहे ना उजवीकडे, ना सामोरे आहे ना मागे, ते ना वर आहे ना खाली, ते निराकार आहे.'[2] त्याचा केवळ निर्देश करता येतो. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे 'ते युक्लिडच्या बिंदूसारखे आहे.'

कबिराचा परमात्मा निर्गुण आहे, सत्त्व, रज व तम हे तीन गुण मानले जातात. परंतु ब्रह्म या तिन्हींपैकी काहीही नाही. ते जन्मत नाही, त्याची वाढ होत नाही, ते मृत्यू पावत नाही. ते केवळ असते (*तत्सत*). 'बर्फ जसे पाण्यापासून बनते व पुन्हा पाण्यात वितळते, तसेच जे होते ते स्वत:तच विलीन झाले आणि त्याच्याबद्दल सांगावे असे काही उरले नाही.'[3] ते जसे निराकार आहे तसेच ते रंगहीनही आहे. ते ऐंद्रीय संवेदनांच्या पार आहे. सर्व कोटिभेदांची सुरुवात त्याच्यापासून होते आणि ते स्वत: मात्र भेदातीत राहते. 'विश्व ईश्वरात आहे, ईश्वर

1. 'साधो, ब्रह्म अलख लिखाया...' : *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 236
( मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 2)
2. *कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास. पृ. 242
3. कित्ता, पृ. 13

विश्वात आहे. तो सर्व घटांत सामावून राहिला आहे. '[1]

परंतु कबीर हा केवळ तत्त्वज्ञ नाही आणि 'परमात्म्याचे वर्णन किंवा त्याची व्याख्या करणे हे तार्किकदृष्ट्या असंभव आहे', एवढेच सांगून तो थांबत नाही. तो कवीही आहे आणि म्हणून काही वेळा तो ईश्वराला मूर्त रूपही देतो. काही ठिकाणी तो परमात्मा व जीवात्मा यांच्यात प्रियकर-प्रेयसीचा किंवा प्रेयसी- प्रियकराचा संबंध शोधू पाहतो. कबिराचा ईश्वर इस्लामचा एकेश्वरवाद व हिंदूंचा अनेकदेवतावाद या दोहोंच्याही पलीकडचा आहे. तो अल्ला आहे, राम आहे, आणखीही काही आहे. कबीर '*ज्ञानसागर*' मध्ये म्हणतो-

तुर्कांच्या मशिदीत आणि हिंदूंच्या मंदिरात
वसती दोघे राम-खुदा
जिथे ना मशीद, नाही मंदिर
तिथे सामावून कोण उभा ?[2]

हा ईश्वर आनंद आहे. या दिव्य आनंदापुढे सर्व भौतिक सुखे व्यर्थ आहेत. कबीर म्हणतो, या ईश्वराची नशा न उतरणारी, कधीही कमी न होणारी आहे. हा दैवी सोमरस दुर्मीळ आहे. तो प्रिय वाटत असला तरी प्रत्येकाला तो मिळू शकत नाही. शंकर व पार्वती यांनी त्याचे प्राशन केले आणि ते अमर झाले.

हा ईश्वर ज्ञान आहे. शुद्ध आणि अमूर्त ज्ञान. तो, 'प्राप्त करायला हवे'असे सत्य आहे. अमर्याद आणि अभंग. वटवृक्षाच्या बीजासारखा सूक्ष्म आणि आकाशासारखा विशाल. या रूपातला ईश्वर प्रकाश आहे. सुफींचा दिव्य प्रकाश किंवा कठोपनिषदात वर्णन केलेला 'जिथे सूर्य, चंद्र, तारे प्रकाशत नाहीत, जिथे वीज चमकत नाही' असा प्रदेश. काही वेळा कबीर ईश्वराला शरीररूपी सरोवरात हासत उभ्या असलेल्या, पूर्ण उमललेल्या कमळाची उपमा देतो.

ईश्वर शब्द आहे. योगसूत्रात शब्दाला 'प्रणव' किंवा 'ओम्' म्हटले आहे. ब्रह्मसूत्रातही शब्दाला ब्रह्म म्हटले आहे. नाथपंथात 'शब्दच सर्व काही आहे; शब्द कुलूप आणि चावीही शब्द आहे; शब्दच शब्दाला जाणतो आणि शब्दाचा अंतही शब्दातच होतो.' सतत स्पंदन पावणाऱ्या या निरंतर शब्दाचे, या अनाहत नादाचे वर्णन करणारे कबिराचे एक सुरेख पद आहे- 'अनहद नाद सदा बाजै.' दुसऱ्या एका पदात तो म्हणतो -

साधू, शब्द-साधना करी
ज्या शब्दातून सर्व प्रगटले, त्या शब्दाला ग्रहण करी

शब्द गुरू, शब्द शिष्य घडवी, विरळ शब्दाची जाण

1. 'खालिक खलक खलक मैं खालिक सब घट रह्यौ समाई।' - कित्ता, पृ. 104
2. तुर्कों की मस्जिद में, और हिंदुओं के मंदिर में,
खुदा और राम दोनों बसते है।
पर जहाँ न मस्जिद है न देवता
वहाँ कौन समाया हुआ है ?
- *ज्ञानसागर*, पृ. 63



अर्थ जो जाणी शब्दांतरीचा, तोचि गुरू तो शिष्य महान
शब्दचि वेद, शब्द पुराण, शब्द प्रमाण आधार
शब्द देव, मुनि-संतही शब्द, शब्दा अंत ना पार

शब्दे केला सर्व पसारा, शब्दात काया जग उपजले
कबीर म्हणतो शब्द जिथे, विश्वरहस्य तेथ आगळे[1]

नाथपंथी आणि बौद्ध शून्यवादी यांच्याकडून मिळालेल्या अनेक संज्ञा कबीर वापरताना दिसतो. तो परमतत्त्वाचे 'शून्य' किंवा 'काही-नसलेले' (*सुन्न-नाकुछ*) असे वर्णन करतो. पण त्याचे 'सुन्न' बौद्ध धर्मात रूढ असलेल्या 'शून्य'पेक्षा वेगळे आहे. ते शंकराचार्यांच्या ब्रह्माच्या संकल्पनेच्या जवळ जाते : ते शब्दातीत आहे. ईश्वराच्या अनुभूतीला कबीर मुक्या माणसाने गूळ चाखण्याची उपमा देतो. हा अनुभव व्यक्त करण्याजोगा नाही. त्याचे वर्णन करता येत नाही. त्याचे संप्रेषण करता येत नाही. ज्या उन्मनी अवस्थेचा कबीर वारंवार उल्लेख करतो ती अशाच प्रकारच्या दैवी उन्मादपूर्ण अनुभवाची अवस्था आहे. वेदांती ज्याप्रमाणे 'नेति-नेति' म्हणतात, त्या धर्तीवर कबीरसुद्धा अनेक वेळा नकारात्मक शब्दप्रणाली वापरतो. केनोपनिषदातील एका भागात ईश्वराचे 'जिथे दृष्टी, वाणी, मानस किंवा ज्ञान पोहोचू शकत नाही अशी अवस्था' असे वर्णन केले आहे. कबीरही ब्रह्माचे वर्णन 'ते कशातही नाही' अशा प्रकारे करतो-

वेदांपार भेदांपार, पापपुण्याच्याही पार
ज्ञानापार ध्यानापार, जड-शून्याच्याही पार
वस्त्रापार भिक्षेपार, दंभ- रूपाच्याही पार
कबीर म्हणे त्रिखंडापार, अनुपम वसते तत्त्व-सार[2]

पण हेच निर्गुण ब्रह्म अचानक नात्याचे माणूस बनते. मात्या-पित्यासारखे, भ्रतारासारखे ('नववधूंनो गा मंगलगान, येती भ्रतार राजा राम'),अतिथीसारखे, स्वामीसारखे ('मी तर श्वान आहे रामाचा'); आणि हाच, अगदी व्यक्तिगत जवळीक असलेला ईश्वर अन्य काही कवितांमध्ये तटस्थ, प्रतिकात्मक, निराकार असा बनून येतो. कबिरामध्ये असे अनेक विरोधाभास आढळतात.

अखेरीस कबिराचा परमात्मा म्हणजे नाम आहे. त्याला कुठल्याही नावाने हाक मारली तरी काय फरक पडणार आहे ? जयदेवांनी रामाला व गोविंदाला आवाहन केले, नामदेवांनी विठ्ठलाला, तर इतर संतांनी अनेक अन्य नावांचा आधार घेतला. कबीर त्याच्या एका पदात या सर्व नावांची गणती करतो आणि निष्कर्ष काढतो की, 'कुठल्याही नावाने स्मरण केले तरी तू तोच राहतोस.'

1. 'साधो, शब्द साधना कीजै..' *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 268
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र.3)
2. 'वेद बिबर्जित भेद बिबर्जित...' *कबीर ग्रंथावली* : (सं) श्यामसुंदर दास, पृ 103
( मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 4)

कबिराची आत्म्याबद्दलची संकल्पनाही इतकीच गूढ आणि बाह्यत: विरोधाभासांनी युक्त असलेली अशी आहे. आत्मा जीव आहे, श्वास आहे, 'स्व' आहे. अहम् आहे. तो लिंगभेदातीत अस्तित्व आहे. तो पिंडातील ब्रह्मांड आहे. आत्मा मन आहे, इंद्रिये आहे, तो सांख्यांच्या तीन प्रकारच्या पुरुषांसारखा आहे - व्यक्त, अव्यक्त आणि दोन्ही जाणणारा. कबिराच्या मते मानवी जीवनाचा परम-उद्देश म्हणजे आत्मज्ञान. ते मिळवण्याचा प्रयत्न करणे ही सर्वोच्च साधना आहे. घट वेगवेगळ्या आकाराचे असतात पण ते एकाच मातीपासून बनलेले असतात. गायींचे रंग वेगवेगळे असले तरी त्यांच्यापासून मिळणारे दूध एकाच रंगाचे असते. आत्मा उंबरठ्यावर ठेवलेल्या दिव्यासारखा आहे. त्याचा उजेड आत व बाहेर, दोन्ही बाजूंना पसरतो. तो अमर आहे, अजन्म आहे, अविनाशी आहे. आत्म्याचे हे वर्णन गीतेतील 'तो मारीत नाही आणि मारलाही जात नाही' अशा अर्थाच्या ओळीशी जुळणारे आहे.

श्वेताश्वेतर उपनिषदात म्हटले आहे, 'आत्मा पुरुष नाही, स्त्री नाही, नपुंसकही नाही. तो ज्या शरीरात वास करतो त्याचे रूप तो धारण करतो.'[1] कबीर त्याचे असे वर्णन करतो-

नाही मानवी, ना ईश्वरी
ना सेवा-आग्रही संत

योगी नाही, नाही अवधूत
माता न त्यासी ना अर्भक

गृहस्थ नाही, नाही साधू
ना राजा ना रंक

हिंदू नाही, नाही शेख
ना जन्मे ना मर्त्य

आत्मा निराकार आहे, तो अमर्याद आहे, परिवर्तनातीत आहे. 'तो समुद्रातल्या थेंबासारखा आहे. त्याच्या थेंबपणात समुद्रपण सामावलेले आहे. तो अलग करता येत नाही.' आत्मा निर्द्वंद्व आहे. तो स्वयंप्रकाशित आहे, सदा-जीवित आहे. तो सूक्ष्मातिसूक्ष्म आहे. ठरलेल्या क्षणाला तो त्याच्या देहाच्या पिंजऱ्याचा त्याग करतो. कबीर आपल्या विणकर-पेशातील एक रूपक वापरतो : 'हे शरीर वापरून जीर्ण आणि विरविरीत होणाऱ्या वस्त्रासारखे आहे. का त्याची आसक्ती धरावी ?'

आत्मा परमात्मा एकच आहे. त्याची बहुपदरी ओळख पटवण्यासाठी कबीर विविध रूपके वापरतो : आत्मा वृक्ष आहे, आत्मा सूर्य आहे, तो किरण आहे, प्रकाश आहे आणि प्रकाशाच्या साहाय्याने जे जे प्रकाशमान होत आहे, तेही तो आहे. तो पक्षी आहे, पिंजरा आहे आणि त्या पलीकडचे आकाश आहे. तो दिवा आहे, वात आहे, दिव्यातले तेल आहे आणि भोवतालचा अंधार दूर करणारी ज्योतही आहे. कमळाला जसे पाणी, दव किंवा सभोवतालचा चिखल

1. नैव स्त्री न पुमाषेन न चैवायं नपुंसक:।
यद्यच्छरीरमादन्ते तेन तेन स युज्यते ॥ -- 5/10



स्पर्श करू शकत नाही, त्याचप्रमाणे आत्मा या सर्वांमध्ये आहे आणि त्यांमध्ये नाहीही. आत्मा पवन आहे, अग्नी आहे, पाणी आहे. आत्मा शब्द, मन, सर्व काही एकत्र आहे. तैत्तरीय उपनिषदात म्हटलेले आहे की 'आनंदच आत्मा आहे, आनंद ईश्वर आहे, आनंद आदी आहे आणि आनंदच अंतही आहे. कबिरामध्ये याचा प्रतिध्वनी सापडतो - 'सर्व देवतांचा आणि सर्व आत्म्यांचा मूलाधार परमानंद आहे.'[1]

वेदान्ती आत्म्याच्या दोन स्थितींचा विचार करतात : एक भौतिक जीवनाने बद्ध आणि दुसरी मुक्त. त्यासंबंधी कबीर म्हणतो - 'आपणा स्वत:ला स्वत:तूनच जाणा.' तो आपल्या एका साखीत म्हणतो -

'सुरति' सामावी 'निरति'त, निराधार राही निरति
द्वारे उघडतील अनायास, ओळखशील जर सुरति-निरति[2]

इथे 'सुरति' (रती) हा शब्द बद्ध आत्म्यासाठी, तर 'निरति' (विरती) मुक्त, अनासक्त आत्म्यासाठी वापरला आहे. कबीर इथे वाट चुकलेला आत्मा, दिशाहीन आत्मा आणि बंधमुक्त होऊ पाहणारा आत्मा यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न करतो. अंतिमत: सर्व आसक्तींपासून मुक्त होऊन उच्च पातळी गाठण्यासाठी आत्म्याला अहम्-विरहित, द्वेष-विरहित आत्मज्ञानाची साधना करावी लागते.

जगत किंवा माया यांविषयींचा कबिराचा तात्त्विक दृष्टिकोनही महत्त्वाचा आहे. उपनिषदांत मायेला ब्रह्म किंवा चिद्-शक्ती म्हटलेले आहे. माया निसर्ग आहे. माया आदिम काळोख (*अविद्या*) आहे. गीतेत मायेला अज्ञान म्हटले आहे, त्रिगुणांचे गारूड करणारी असे म्हटले आहे. शंकराचार्य तिला आभास मानतात; तसेच आधुनिक भाषा-वैज्ञानिक ज्याला 'मानसिक संरचना' म्हणतात, त्या तऱ्हेची गोष्ट मानतात. मायेच्या सामर्थ्याचे वर्णन करण्यासाठी कबीर अनेक प्रकारची रूपके वापरतो. तो म्हणतो की, माया एक अशी विलक्षण वेल आहे जी -

छाटली तर फोफावेल, कोमेजेल जर दिले पाणी
या गुणवंती वेलीचे, वर्णू शके ना गुण कोणी[3]

माया स्वत:सारख्या असंख्य पिल्लांना जन्म देणारी एक नागीण आहे. माया क्षणजिवी आहे, क्षणाक्षणाला बदलणारी आहे. ती सर्व काही घुसळून काढते. तिच्यामुळेच दु:ख आहे. ती धुक्याचा झिरझिरीत पडदा आहे. ती कपाशीतल्या अग्नीसारखी सुप्त आहे. रंगरंगोटी करून खुल्या बाजारात उभ्या राहिलेल्या वेश्येप्रमाणे ती आत्म्याला मोहात पाडू पाहते. सर्व भेदभावांचे

1. *कबीर ग्रंथावली* : (सं) श्यामसुंदर दास, पृ. 187
2. सुरति समानी निरति में, निरति रही निरधार।
सुरति निरति परचा भया, तब खुले स्यंभ दुवार॥
- *कबीर वाङ्मय* : (सं.) शुकदेव सिंह, राजदेव सिंह, पृ.69
3. जे काटौं तो डहडही, सींचौं तो कुमिलाइ।
उस गुणवंती बेली का, कुछ गण कह्यां न जाइ॥
- *कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 86

मूळ माया आहे आणि सर्व सृजनही तिच्याचमुळे आहे.

रंगविले हे चित्र जयाने, कठपुतळ्यांचा खरा सूत्रधार
जे हे केवळ चित्र मानती, त्यांचा असो शतशः धिक्कार

अशा तऱ्हेच्या तात्त्विक मांडणीच्या ओघातूनच कबिराचे मुक्तीसंबंधीचे किंवा अंतिम मोक्षासंबंधीचे विचार येतात. प्रत्येक भारतीय संताला किंवा द्रष्ट्याला या ऐहिक दुःखचक्रापासून सुटका करून घेण्याची तळमळ लागलेली असते. कबिराच्या मते अमरत्व हेसुद्धा माणसाने साध्य मानावे अशा अंतिम मूल्यांपैकी एक आहे. जन्म-समागम-मृत्यू या चक्रातून बाहेर पडून ज्योत ज्योतीत विलीन होणे याला कबीर अनंताशी महामिलन मानतो. त्याची निर्वाणाची संकल्पना योग किंवा बौद्ध तत्त्वज्ञानात वर्णन केलेल्या संकल्पनेसारखीच आहे. बौद्ध इंद्रियप्रत्ययवादी तत्त्वज्ञ नागार्जुन याने निर्वाणाला अंतिम सार्थ सत्य (*परमार्थ सत्य*) म्हटले आहे. कबीर या अवस्थेला निर्भय अवस्था (*निरभै पद*) म्हणतो. साधक जेव्हा सर्वांच्या सेवेत रममाण होतो आणि त्याला जेव्हा एक प्रकारची समदृष्टी प्राप्त होते तेव्हा त्याला भयाचा स्पर्श होऊ शकत नाही. भय राहिलेच तर ते फक्त अंतर्मनातील पापजाणीवेचे -

परिचय कर तू स्वतःशी, आपणातच सामावणे
कबीर म्हणे जाण स्वतःला, निमेल येणेजाणे[1]

कबिराच्या मते बंधन म्हणजे एक व्यक्तिनिष्ठ आभास आहे. एकदा का या आभासाचा निरास झाला की, केवळ शुद्ध अद्वैताचा अनुभव मागे उरतो. 'पाण्यात घडा आहे, घड्यात पाणी आहे, घडा फुटला की पाणी पाण्यात मिसळते.' 'दोन घडे पाण्यात तरंगत आहेत, त्यांच्यात प्रतिबिंब पडले आहे. दोन्ही घडे फुटतात, प्रतिबिंब विखुरते आणि तरीही आता ते विस्तृत जळात दिसू लागते. प्रतिबिंब तेच राहते.'

कबीर म्हणतो की याच प्रकारे बंधनापासून मुक्ती म्हणजे कुठलीही बाह्य गोष्ट नाही. ती बाह्य कारणांनी प्रेरित अशी स्थितीही नाही. या मायावी मोहजालातून सुटण्यासाठी अंतर्मनातून स्फुरलेली ती आच आहे. यातून 'जीवनमुक्त' अवस्था प्राप्त झाली की जगातला सारा अंधकार नाश पावेल, आत्म्याचे अंधत्व नष्ट होईल.

ही अवस्था प्राप्त करण्यासाठी कबीर एक नियमबद्ध आचारसंहिता असलेली साधनापद्धती आखून देतो. त्यात प्राणायाम आहे, इंद्रियनिग्रह आहे; पण इथे या गोष्टींची चर्चा आवश्यक नाही. जाता जाता फक्त एवढाच उल्लेख करता येईल की, कबीरपंथी किंवा कबिराचे रूढिग्रस्त अनुयायी हे या विधींशी किंवा साधनापद्धतीशी सहमत नाहीत. ही साधनापद्धती म्हणजे योगक्रियेप्रमाणेच, शरीरावर नियंत्रण मिळवून आध्यात्मिक चेतना जागृत करण्याची एका तऱ्हेची मानसशास्त्रीय प्रक्रिया आहे. हठयोग, मंत्रयोग, लययोग, सहजयोग आणि राजयोग या विविध

---

1. अपनैं परचै लगी तारी, अपन मैं आप समांना।
कहै कबीर जे आप विचारे, मिटि गया आवनजांना॥
-*कबीर ग्रंथावली* :(सं.) श्यामसुंदर दास, पृ. 10



योगपद्धतींमधून सर्वोत्तम ते सारग्राही वृत्तीने एकत्रित करून कबिराने आध्यात्मिक स्पर्श असलेली एक तपस्वी दिनचर्या विकसित केली आहे.

कबीर आधुनिक सुधारणावाद्यांचे लक्ष वेधून घेतो ते एक सामाजिक आणि नैतिक सुधारक म्हणून. बुद्धाप्रमाणेच त्याने जातीच्या नावावर विषमता व सामाजिक अन्याय फैलावण्याच्या कुटीलतेची निर्भत्सना केली. त्याने हिंदू आणि मुस्लिम दोघांच्याही अंधश्रद्धांची रेवडी उडवली. आणि एखाद्या विज्ञाननिष्ठ बुद्धिवाद्याप्रमाणे त्याने दोघांचेही ढोंग व खोटेपण सिद्ध करण्याचे आव्हान शिरावर घेतले. कबीर वास्तववादी होता आणि म्हणून न संकोचता तो गाऊ शकला-

भुकेलेला ना करी भक्ती, घे ही माळ परत तुझी
डाळ हवी अर्धा शेर, जेवायला दोन्ही वेळ
हवी खाट चारपाई, एक उशी आणि एक रजई
मी नाही मारत बाता, एक नाम रुचे तव त्राता[1]

कबिराने साठेबाजी आणि संपत्तीचे प्रदर्शन करण्याच्या प्रवृत्तींचीही निंदा केली. सर्व तऱ्हेच्या विलासांना आणि मादक पदार्थांच्या सेवनाला त्याने विरोध केला. त्याने साध्या व समाधानी राहणीचा पुरस्कार केला. प्रत्येकाने आपापल्या पेशाप्रमाणे काम करावे, शारीरिक कष्ट करावे, कोणीही दुसऱ्याच्या मालमत्तेचा अपहार करू नये, अशा त्याच्या धारणा होत्या. राजाचा लोभ आणि राजनीतीद्वारे झालेली भरभराट या गोष्टीही त्याच्या टीकेतून सुटल्या नाहीत. तो विचारतो - 'फौज गोळा करणे आणि किल्ल्यांना वेढा घालून शक्ति-प्रदर्शन करणे हेच बादशहाचे काम असते काय ? बादशहाच्या मरणानंतर या खेळातले काय शिल्लक राहते ?'

'राजाकडे करोडो रुपये आणि हजारो हत्ती आहेत. पण कंजुषाच्या संपत्तीचा काय उपयोग?'

'राजा आणि त्याची प्रजा दोन्ही मूलतः एकच आहेत : मानवप्राणी. 'ओम्' या एकाच मुळापासून दोघे उपजतात.'

कबीर सर्व तऱ्हेच्या सांप्रदायिकतेचा आणि संकुचित दृष्टिकोनाचा विरोधक होता. 'ब्राह्मण उच्च जातीचे नाहीत आणि शूद्रही नीच जातीचे नाहीत. मग एकमेकांचा द्वेष का करावा ? असे करणे म्हणजे मूर्खपणा आहे.'

बाह्याचार अर्थहीन आहेत. सर्वांगाला भस्म फासणे, दिवसातून तीन-तीन वेळा स्नान करणे, उपास करणे, तीर्थयात्रांना जाणे, जपमाळेचे प्रदर्शन करणे, मोठमोठ्याने देवाचे नाव उच्चारणे, शरीराला पीडा करून घेणे, या सर्व गोष्टींचा कबिराने तीव्र शब्दांत उपहास केला आहे.

का चोपडशी अंगा माती, का करशी तू जळात स्नान
नामपठण का, का जपमाळ, का मशिदीत झुकवशी मान
नमाज का, का रोजा करशी, करशी का तू काबा-हाज

---

1. 'भुखे भगति न किजे...' *कबीर ग्रंथावली* : (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 314
( मूळ पूर्ण पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र.5)

ब्राह्मण करी चोवीस एकादशा, काझी एक मास रमजान

आणखी एका पदात कबीर म्हणतो -

जर खुदाचा निवास मशिदी, इतर मुलखात राहते कोण
राम असे जर तीर्थी-मूर्तीत, त्याबाहेर पाहते कोण
पूर्व दिशेला हरिचा निवास, पश्चिमेला अल्ला राही
हृदयी शोध तिथेच वसती, दोन्ही राम-करीम पाही
जगतामधल्या स्त्रीपुरुषांमध्ये, आढळेल तुज रूप तुझे
कबीर बालक राम-अल्लाचा, पीर अन् हरी गुरू माझे [2]

कबीर अतिशय टोकदार व समर्पक अशी रूपके वापरतो. 'गळ्यात जानवे घातल्यामुळे कोणी द्विज बनत असेल, तर गळ्याभोवती सतत दोर बांधलेला रहाट ब्राह्मण का नाही ?' 'मशिदीच्या उंच मीनारावर उभा राहून काझी एवढ्या मोठ्याने बांग का देतो ? खुदा बहिरा का आहे ?' 'बकरी पाला खाते आणि तरी ती सोलली जाते. जे बकरीला खातात त्यांचे काय होईल ?' 'मृत आप्तांची पूजा करणाऱ्या या मूर्खांकडे पाहा. स्मशानात ते मृतदेह जाळतात आणि नंतर मोठे प्रेम व आपुलकी दाखवतात. जिवंत असताना वृद्धांना ते काठ्यांनी मारतात आणि मेल्यावर त्यांना गंगाजल पाजतात. घरातील म्हाताऱ्या माणसांना एरवी उपाशी ठेवतात आणि मेल्यावर मात्र पितरांसाठी भाताचे पिंड ठेवतात. जिवंतपणी वृद्धांना शिव्याशाप देतात, मेल्यावर मात्र त्यांच्या स्मरणार्थ श्राद्ध घालतात.' कबीर म्हणतो, 'कावळ्याला खायला दिलेले अन्न पितरांपर्यंत कसे पोहोचते याचे मला आश्चर्यच वाटते.' (*कबीर ग्रंथावलीतून*)

डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी आपल्या कबीर या प्रसिद्ध हिंदी ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे (पृ 138) की, धार्मिक रूढींवरची कबिराची टीका ही हठयोगी व कबिराचे गुरू रामानंद या दोहोंच्या परंपरेतून आलेली आहे. ते लिहितात-

'कबीर ज्या काळात उपदेश करत होता त्या काळात पुराणमतवादी हिंदुधर्म प्रबळ होता, पण तो सर्वसामान्य गृहस्थाश्रमी लोकांचा धर्म होता. देशात त्या काळात आणखी अनेकविध प्रकारच्या साधना-पद्धतीही प्रचलित होत्या. कोणी वेद घोकणारा होता. कोणी जग नाकारणारा 'उदासी' होता, कोणी मुद्दाम दारिद्र्य पत्करत होता, कोणी दानधर्मात मग्न होता, तर कोणी मद्यपान म्हणजेच परम साधना मानत होता. जादूटोणा करणारे काहीजण होते, काही वैदूगिरी करत स्वतःला सिद्ध म्हणवून घेत होते, काहीजण फक्त तीर्थयात्रा करत होते, तसेच धुराने शरीर काळवंडून घेणारेही काही होते. असे सर्व होते, पण रामनामात लीन झालेला कोणी नव्हता. सद्गुरूच्या (रामानंद?) कृपेने कबिराला मात्र हा महामंत्र मिळालेला होता. त्या काळात

1. 'अलह राम जीउँ तेरे...' *कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 301
(मूळ पूर्ण पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 6)
2. 'जो खोदाय मसजीद...' *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 272-273
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 7)



मुनी होते, पीर होते, दिगंबर साधू होते, जोगी-जंगम होते, ब्राह्मण होते, संन्यासी होते, पण सर्वजण मायेच्या जाळ्यात गुरफटलेले होते. काही संप्रदाय असेही होते की त्यांच्या धार्मिक मिरवणुकीत बंदुका व तोफा नेल्या जात असत. कबीर हैराण होऊन विचारी, -'मित्रांनो, कसली अजब योगसाधना आहे ही! महादेवाच्या नावाने पंथ चालू केला आहे, लोक स्वतःला महंत म्हणवून घेत आहेत, ते भर बाजारात समाधी लावतात आणि क्षुल्लकशा कारणाने बंदुका-तोफांनी हल्ले करतात? दत्तात्रेयांनी कधी आपल्या शत्रूवर असा सशस्त्र हल्ला केला होता? शुकदेव कधी शस्त्रे बाळगीत होते ? नारदांनी कधी बंदूक चालवली होती? अजब आहेत हे स्वतःला विरक्त म्हणवणारे. त्यांची सोन्याची सिंहासने झगमगत आहेत. त्यांच्या हत्ती-घोड्यांच्या रांगा उभ्या आहेत. त्यांचा थाट एखाद्या करोडपतीसारखा आहे.' या वर्णनावरून कुंभमेळ्यातील नागा साधूंच्या हल्ल्यासारखी एखादी घटना कबिराने पाहिली असावी, असे दिसते. अशा तऱ्हेच्या विचित्र आणि तऱ्हेवाईक धार्मिक प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर कबिराने आपला प्रेम-भक्तीचा धर्म आचरण्यास व त्याचा प्रसार करण्यास सुरुवात केली.'

हठयोगी परंपरेची चर्चा करताना डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी आठव्या शतकातील सरहपाद नावाच्या एका प्रारंभकालीन सहजयानी सिद्धाचे एक मनोरंजक उद्धरण देतात (पृ. 142, 143) - 'ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून उत्पन्न झाले. असे कधी घडले तेव्हा घडले. हल्ली ब्राह्मण इतर लोकांप्रमाणेच जन्माला येतात. मग त्यांच्यात ब्राह्मणत्व काय राहिले ? संस्कारांनी ब्राह्मणत्व निर्माण होते असे जर तुम्ही म्हणत असाल तर चांडाळालाही हे संस्कार देऊन ब्राह्मण बनविणे शक्य व्हायला हवे. आणि तुम्ही म्हणता की ब्राह्मण हातात दर्भ-जल घेऊन घरात बसून हवन करतात म्हणून ते पवित्र असतात किंवा अग्नीला तुपाचे अर्घ्य दिल्याने मोक्ष मिळतो, तर या गोष्टी सर्वांना का नाही करू देत? एक मात्र निश्चित की होम-हवनातून निघणारा धूर दृष्टीला अंधत्वच आणतो.' सिद्धांची ही स्पष्ट व परखड टीकेची परंपराच कबिराने पुढे चालवली.

जी. एच. वेस्टकॉट यांनी आपल्या *कबीर अँड द कबीरपंथ* या ग्रंथात कबीर-वाणीची खालील काही उदाहरणे दिली आहेत (पृ. 37 ते 40) :

'जपमाळेचे मणी लाकडाचे आहेत, देव दगडाचे. गंगा, यमुना म्हणजे पाणी आहे. राम व कृष्ण मृत्यू पावले आहेत. चारी वेद म्हणजे केवळ काल्पनिक कहाण्या आहेत.

'दगडाची पूजा केल्याने जर देव प्राप्त होत असेल, तर मी पर्वताची पूजा करीन. या मूर्तीपेक्षा तर घरातील जाते अधिक चांगले. त्याच्यापासून पीठ तरी मिळते.

'पाण्यात बुडी घेतल्याने जर मोक्ष लाभत असेल तर बेडूक सदा पाण्यातच बुडालेले असतात. हे लोक त्या बेडकांसारखेच आहेत, ते पुन्हा पुन्हा गर्भावस्थेत जात राहतात.

'दगड हातोड्याने फोडून व त्याला आकार देऊन पाय, छाती असलेली मूर्ती तयार केली जाते. ही मूर्ती खरी असेल तर तिने हातोड्याचे घाव घालणाऱ्या मूर्तीकारालाच खाऊन टाकायला हवे.

'गर्भावस्थेत असताना ना वंश असतो, ना जात असते. सारी सृष्टी ब्रह्माच्या बीजापासून निर्माण झाली आहे.

'तू ब्राह्मण आईच्या पोटी जन्माला आलेला ब्राह्मण मुलगा आहेस, तर तू अन्य मार्गाने का नाही आलास ?

'तू कोणाचा ब्राह्मण? मी कोणाचा शूद्र ? मी कोणाचे रक्त ? तू कोणाचे दूध? कबीर म्हणतात, जो ब्रह्माचा विचार करतो त्यालाच मी ब्राह्मण मानतो.

'पाणी मलिन आहे, पृथ्वी मलिन आहे, जन्मवेळ मलिन आहे, मृत्यूची वेळ मलिन आहे, सारा विनाश मलिन आहे.

'दृष्टी मलिन, वाणी मलिन, कान मलिन. उठता बसता माणसाला मालिन्य चिकटलेले असते. ते अन्नातही पडत राहते.

'जाळ्यात अडकवणे सर्वांना माहीत असते पण त्यातून सुटका करून घेण्याचे मार्ग फार थोडे लोक जाणतात.'

कबिराच्या अनेक उक्त्या व पदे यांचा '*आदिग्रंथ*' या शीखांच्या पवित्र ग्रंथात 'साखीं'च्या रूपात समावेश झाला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. मॅकॉलिफच्या *द सिख रिलिजन* (दोन खंड) आणि साहित्य अकादेमी व युनेस्को यांनी प्रकाशित केलेल्या *सिलेक्शन्स फ्रॉम द सेक्रेड बुक ऑफ सिख्स* या ग्रंथामध्येही असे अनेक उतारे आढळतात.

कबीर हा काही जनसामान्यांच्या कोलाहलापासून दूर, आपल्या आध्यात्मिक गिरिकंदरात राहणारा, असा गूढवादी नव्हता. जिथे तो राहिला त्या त्याच्या बनारसमधील साध्या झोपडीपासून, तर जिथे त्याचे निधन झाले असे मानले जाते त्या असिघाटापर्यंत, त्याने धर्माच्या नावावर चालवलेल्या लुबाडणूक-ढोंग-खोटेपणा यांसारख्या गोष्टी पाहिल्या. हे सर्व पाहून एखाद्या मुक्याबहिऱ्यासारखे गप्प राहायचे नाही, असे त्याने ठरवले. तो स्पष्टपणे सत्य सांगत राहिला. याला धैर्याची आवश्यकता होती. विशेषकरून बुद्धिप्रामाण्यवाद दुर्मीळ असण्याच्या आणि प्रस्थापित धर्माला विरोध हे घोर पातक समजण्याच्या त्या काळात. पण कबिराने हे कार्य एवढ्या धीरोदात्तपणे व परिणामकारकरीत्या केले की, हिंदूंना त्याला संत म्हणून मान देण्याशिवाय पर्याय उरला नाही. त्याच्या मार्गाला कबीर -पंथ म्हणून आदराचे स्थान मिळाले.

या प्रकरणाचा शेवट आपण अशा एका कवितेने करू या, जिच्यात कबिराच्या तत्त्वज्ञानाचे सारच काव्यरूपाने आले आहे. रवीन्द्रनाथ टागोरांच्या अनुवादात जिचा समावेश आहे ती ही कविता :

तीर्थस्थानी केवळ पाणी, व्यर्थ आहे न्हाऊन पाहिले
मूर्ती सर्व निष्प्राण बंधू, नाही बोलत बोलून पाहिले
कुराण पुराण साऱ्या गप्पा, दूर करून पडदा पाहिले
गोष्टी अनुभवाच्या सांगे कबीर, फोल सर्व डोलारा हे पाहिले [1]

□□□

1. 'तीरथ में तो सब पानी है... ' - *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी पृ. 262
( मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 8)

# 3
# काव्य

शब्दाचा शोध घे, जाण तू शब्दाला, शब्द नि शब्दच तू आहेस रे भाई
शब्द आकाश असे, शब्दचि पाताळ, शब्दातच पिंड नि ब्रह्मांड राही
उक्तीत शब्द असे, श्रवणीही शब्द, मूर्ती बनवती शब्दांत कल्पुनी
शब्द ते वेद, शब्दचि नाद, शब्दचि शास्त्रे विविधरूपे गायनी
शब्दचि यंत्र, शब्द ते मंत्र, गुरूही शिष्याला शब्दचि ऐकवी
शब्दचि सार, शब्द असार, शब्द आकार, शब्द निराकारही
शब्द पुरुष असे, शब्दचि स्त्री, शब्द स्थापती तिन्ही लोकही
शब्द दृष्ट नि अदृष्ट ओंकार, शब्दचि सकल ब्रह्मांड होई
कबीर म्हणे तू पारखून घेई शब्द, शब्दचि अपुला ईश्वर रे भाई [1]

गूढवादी कवितेचे मूल्यमापन करतानाही शुद्ध कवितेचे मापदंड वापरायला हवेत का, हा संस्कृत अलंकारशास्त्री आणि पाश्चिमात्य सौंदर्यमीमांसक यांच्यातील एक दीर्घकालीन चर्चेचा विषय आहे. अंशत: हा, उदात्त आणि सुंदर, यांमधला खूप जुनाच भेद आहे. संस्कृत भाषेत काव्यशास्त्रावर लिहिणाऱ्या सर्वसमावेशक वृत्तीच्या समीक्षकांनी यातून मार्ग काढताना दोहोंना 'जुळे' संबोधत, काव्यातून मिळणाऱ्या आनंदाला 'ब्रह्मानंद सहोदर' असे नाव दिले. दुसरीकडे हिंदीतील अनेक रूढिप्रिय व परंपरानिष्ठ समीक्षक कबिराला कवी मानत नाहीत. अगदी आजही असे लोक आहेत. ते कबिराला ओबडधोबड पद्यरचना करणाऱ्या भक्तांच्या व संतांच्या पंक्तीत बसवतात. असले समीक्षक तंत्राची सफाई आणि शैलीची परिपूर्णता यांसारख्या गोष्टींवर अवाजवी भर देतात. पण व्यक्तित्व हे जर कवीचे एक लक्षण मानले, तर कबीर नि:संशय एक महान कवी आहे.

कबीर काही वेळा दुर्बोध वाटणाऱ्या प्रतिमा व प्रतीके वापरतो. अर्थात आधुनिक कवींच्या व्यक्तिनिष्ठ प्रतिमासृष्टीच्या मानाने ही दुर्बोधता कमीच आहे. ब्लेक किंवा रिल्केच्या काव्याप्रमाणेच कबिराच्या कवितेत अशा अनेक जागा येतात की ज्या वरकरणी साध्या भासल्यातरी गहन अशा आध्यात्मिक अर्थपूर्णतेने त्या भारलेल्या असतात. खरे म्हणजे कबीर निव्वळ कवी नव्हताच. तो त्याहून बरेच काहीतरी होता. एकाचवेळी कबीर दोन मितींमध्ये जगत होता. ईश्वराची जाणीव व काव्य या त्याच्यासाठी भेद असलेल्या अशा दोन वेगवेगळ्या

1. 'शब्द को खोजि ले...' *कबीर वचनावली* : (सं.) अयोध्यासिंह उपाध्याय 'हरिऔध', पृ. 198
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 1)

मानसिक अवस्था नव्हत्या. जर्मन गूढवादी मेइस्टर एखार्टने बरोबरच म्हटले आहे - 'माणसाने एकत्व साधले पाहिजे. याचा अर्थ त्याने ईश्वराचे, आणि केवळ ईश्वराचेच दर्शन घ्यायला हवे.आणि त्यानंतर त्याने 'परतून' यायला हवे.म्हणजे असे की ईश्वराचे ज्ञान व्हायला हवे आणि या ज्ञानाची जाणीवही असायला हवी.' कबीर अशाच तऱ्हेच्या दैवी आनंदाने झपाटलेला असावा. म्हणूनच तो विचारतो- 'अग कमलिनी, तुझ्या देठाशी तलावाचे पाणी आहे, तुझा जन्मच पाण्यात झाला आहे, तू पाण्यात राहिलीस, सदा पाण्याने वेढलेली राहिलीस, तुझ्या आजूबाजूला अग्नीही नाही, तरीही तू का कोमेजलीस ...?'[1]

## भाषा

कवितेतून काव्यबाह्य संवेदनशीलतेचे जे आदानप्रदान होते त्याची महत्त्वाची कळ म्हणजे कवीची भाषा. प्रत्येक कवी त्याची स्वत:ची अशी शब्दकळा निवडतो. तो त्याच्या कल्पनेतील श्रोत्यांशी संवाद साधत असतो. कबिराचे मोठेपण असे की त्याने शिष्टसंमत संस्कृत किंवा राजदरबारातील फारसी या भाषांना महत्त्व दिले नाही. त्याने त्याची पदे आणि गीते त्याच्या स्वत:च्या अशा मिश्र भाषेत रचली. हिंदी साहित्यातील विद्वानांनी तिला 'सधुक्कडी' (साधूंची भाषा ) असे नाव दिले आहे. डॉ. गोविंद त्रिगुणायत म्हणतात, 'कबीर एकच एक भाषा वापरत नाही. त्याच्या 'कबीर-बानी'त आपल्याला हिंदी, उर्दू, फारसी या भाषांचे, तसेच भोजपुरी, पंजाबी, मारवाडी यांचे मिश्रण आढळते.[2] डॉ. श्यामसुंदर दास यांनी संवत 1561 (इ. स. 1508) व संवत 1881 (इ.स. 1828) या सालांमधल्या दोन हस्तलिखितांचा आधार घेऊन संपादित केलेला *कबीर ग्रंथावली* हा ग्रंथ म्हणजे कबिराच्या कृतींचे पहिले प्रामाणिक संकलन आहे. दुसरा ग्रंथ आहे डॉ. रामकुमार वर्मा यांचा *संत कबीर*. यात *गुरू ग्रंथसाहब* मधील कबिराच्या पदांचाही समावेश आहे. या दोन्ही ग्रंथांतून खालील गोष्टी दिसून येतात 1) पंजाबी वळण 2) भोजपुरी नामे व क्रियापदे 3) 'खडी बोली'तील काही रूपे 4) विषयानुरूप भाषा 5) प्रादेशिक भाषांमधले अनेक शब्द 6) साधी व थेट अभिव्यक्ती 7) प्रतिकात्मक व उलटबाँसी रचना 8) कुठल्याही शिष्टसंमत काव्यरूपाचे अनुकरण करायचे नाही.

*हिंदी साहित्य का इतिहास* या आपल्या ग्रंथात आचार्य रामचंद्र शुक्ल म्हणतात की हिंदीतील संतकवींनी आपल्या काव्यात सिद्धांकडून वारसा म्हणून मिळालेल्या खडी बोलीचा वापर केला. पण डॉ.त्रिगुणायत यांना हे मान्य नाही. ते म्हणतात की कबिराने केवळ बनारसजवळ आढळणाऱ्या 'पूरबी' या बोलीभाषेचाच वापर केलेला आहे असे नाही. इतर भागांतून येणाऱ्या साधुसंतांपर्यंत आपली वाणी पोहोचावी यासाठी त्याने विविध बोलीभाषांचा वापर केला. कबीर जेव्हा हिंदू पंडितांविषयी बोलतो तेव्हा तो फारसीयुक्त हिंदी वापरतो. त्याच्या पदांमध्ये 'आछिलो' हे बंगाली क्रियापदही आढळते. तसेच राजस्थानी व लेहंदा शब्दही येतात. साधी, सरळ पण अर्थाच्या दृष्टीने तेवढीच गहन हे त्याच्या भाषेचे एक वैशिष्ट्य आहे. याव्यतिरिक्त

1. *कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 183
2. *कबीर की विचारधारा* : गोविंद त्रिगुणायत, दुसरी आवृत्ती पृ. 295



आणखी एक कठीण बाब म्हणजे मौखिक परंपरेतून आल्यामुळे एकाच पदाचे अनेक पाठभेद आढळतात. अनेक शब्दांमध्ये तर इतके बदल झाले आहेत आणि ते अशा भ्रष्ट स्वरूपांत आढळतात की त्यांतून मूळ शब्द शोधून काढणे अतिशय जिकिरीचे होते.

उलटबाँसी रचनांमधील कबिराच्या भाषेला तिच्या दुर्बोधतेमुळे आणि तिच्या संदिग्धतेमुळे, विधुशेखर भट्टाचार्यांना अनुसरून, 'संधाभाषा' किंवा 'संध्याभाषा' म्हटले गेले आहे. याचा अर्थ अनेक भाषांचा मिलनबिंदू असलेली भाषा किंवा सायंकाळची धूसर भाषा. डॉ. शशिभूषण दासगुप्ता यांनी आपल्या *ऑब्स्कयुअर रिलिजस कल्ट्स* या पुस्तकात यासंबंधी चर्चा केली आहे. तसेच भाषेच्या अशा कोड्यासारख्या वापराची विविध कारणेही दिली आहेत. एकतर भाषेचा असा वापर शत्रूचा गोंधळ उडवण्यासाठी जाणून-बुजून केलेला असावा किंवा कबिराची भाषा 'अपभ्रंश' व हिंदी या भाषांचे मिश्रण असावी. किंवा ती बिहार व बंगालच्या सीमेवर वापरात असलेली भाषा असावी. संस्कृतात 'संधी' हा शब्द रूपकात्मक भाषेसाठीसुद्धा वापरला जातो. तर असेही असेल की, तांत्रिक ज्याप्रमाणे आपल्या गुप्त धारणा आणि समाजमान्य नसलेले गूढ तांत्रिक विधी लपवून ठेवतात, त्या धर्तीवर कबिराने जाणीवपूर्वक ही भाषा वापरली असेल. कारण काहीही असो, कबिराच्या रचनांमध्ये अशी अनेक पदे आढळतात की जी वरकरणी तर्कसंगत वाटत नाहीत. कदाचित, क्लिष्ट संस्कृत रचना करणाऱ्या पंडितांना गडबडवून टाकण्याच्या मौजेसाठी कबिराने हे केले असेल. त्याच्या या 'संध्याभाषे'ची काही उदाहरणे 'विरोधाभास' शीर्षकाखाली पुढे दिली आहेत.

## विरोधाभास

या पदांना उलटबाँसियाँ किंवा उलट-बतियाँ (उलटे बोल) असेही म्हटले गेले आहे. *कबीर ग्रंथावली* तील या प्रकारचे एक उदाहरण-

ऐसे अद्‌भुत गुरूंनी कथिले, खिळून राहिलो मी
हत्तीशी मूषक लढे, हे अजब पाहिले कोणी
बिळात शिरता मूषक, साप भयाने पळू पाही
उलटा मूषक गिळे सापाला, आश्चर्य काय घडे भाई
मुंग्या उखडती पर्वता, उचलूनी नेती मैदानी
लढे कोंबडा मांजराशी, पाण्यामागे धावे अग्नी
गाय लुचते बछड्यासी, बछडा पाजी दूध
नवल वर्तले असे की, सिंहाला मारी मृग
लपून बसे व्याध अरण्यी, शरसंधान तो करी ससा
कबीर म्हणे त्या गुरू करा, सांगू शके जो अर्थ याचा.[1]

डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी अशा कवितांच्या चर्चेसाठी 'योगपरक रूपक और

1 'ऐसा अद्‌भुत मेरे गुरि कथ्या..' : *कबीर ग्रंथावली*, (सं.) श्यामसुंदर दास, पृ. 141.
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र.9)

उलटबाँसिया' नावाचे एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. त्यात *कबीर ग्रंथावली* तील एक पद (पृ.141-142) उद्धृत करून त्यातील 23 प्रतिकात्मक शब्दांच्या विश्वनाथ, विचारदास आणि परंपरावादी यांनी दिलेल्या तीन वेगवेगळ्या स्पष्टीकरणांचा एक आलेखच सादर केला आहे. हे पद असे आहे-

संतांनो, जागेपणी घेऊ नका निद्रा
काळ ना खाई, कल्प ना व्यापी, वय ना झीजवी शरीरा।
उलटी गंगा सागर शोषे, काळोखी रवीला ग्रासे
रोगी वधतो नवग्रहांना, जळात बिंब प्रकाशे
पंगू दौडे दाही दिशा, नेत्रहीन तो पाही जगा
ससा घास सिंहाचा घेई, नवल काय ते हे सांगा
उपडा घडा न जळात बुडतो, सरळ केल्यावर भरे
त्याच तऱ्हेने भिन्न नर जरि,गुरूप्रसादाने तरती सारे
गुहेत बसून दिसते विश्व, काही न सुचते बाहेर
शर उलटा लागे व्याधाला, हे केवळ जाणतो शूर
विनंती करूनही गाई न गायक, अबोल नित्यचि गाई
नट- डोंबारी प्रेक्षक पाही, अनाहत हेतु वाढवी
कथ्य न्याहळी वदन स्वत:चे, अशी अकथ्य कहाणी
धरती उलट वेधी आकाशा, ही मनुजाची वाणी
पेल्याविना अमृत आचवे, नदी पाण्याला राखी
कबीर म्हणतो अमर होई, जो रामसुधारस चाखी [1]

पहिल्या वाचनात अशा रचना म्हणजे अर्थहीन प्रलाप वाटतात हे निश्चितच. पण प्रत्येक शब्दाला काहीतरी सांकेतिक अर्थ आहे. आत्म्याचा निर्देश पुत्र, वासरू, शिकार, सिंह, उंदीर, भुंगा, योगी अशा शब्दांनी केला आहे. माया ही वेश्या, स्त्री, बकरी, गाय व मांजरी आहे. जग हे अरण्य किंवा महासागर आहे. इंद्रिये पाच कुमारिका किंवा पाच मित्र आहेत. काही रचनांमध्ये विशिष्ट संख्यांचाही उल्लेख आहे. पाच : तत्त्वे किंवा इंद्रिये, तीन : गुण किंवा काल किंवा तिन्ही लोक, शरीरातील संप्रेरके स्रवणाऱ्या अंतर्स्रावी ग्रंथींसारख्या काहीशा असणाऱ्या हठयोग्यांच्या अष्ट-शरीरचक्रांसाठी आठ, आणि

चौदा चंद्रांमध्ये उजळले दिवे असे चौसष्ट
काय चांदणे असे त्या घरी जिथे नसे गोविंद [2]

1 'सन्तो, जागत नींद न कीजै...' *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.89-90
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 10)
2 चौसठि दीवा जोइ करि, चौदह चंदा माहि।
तिहिं धर किसकौ चानिणौं, जिहि घरी गोविंद नांहि॥
-*कबीर ग्रंथावली सटीक* : पुष्पपाल सिंह, पृ. 73



अशा दोह्यांमध्ये चौसष्ट दिवे म्हणजे चौसष्ट कला आहेत, तर चौदा चंद्र म्हणजे चौदा विद्या आहेत.

अशा तऱ्हेच्या विरोधाभासांची परंपरा उपनिषदांपासून चालत आलेली आहे. 'उर्ध्वमूल अधोशाख:', 'वृक्ष आणि दोन पक्षी' ही उदाहरणे सर्वज्ञात आहेत. तैत्तरिय उपनिषदात एक असा भाग येतो ज्यात 'आकाश राहते पृथ्वीत आणि पृथ्वी आकाशात' असे म्हटलेले आहे. ही परंपरा वज्रयानी बौद्धांनीही पुढे चालवली. कदाचित कबिराने ती त्यांच्याकडून ग्रहण केली असावी.

## छंद

कबिराच्या रचनांमध्ये छंदांचे वैविध्य किंवा कौशल्य फारसे आढळत नाही. तो दोहा किंवा साखी, सबद व रमैनी यांसारखे सर्वसाधारण छंद वापरतो. रमैनी म्हणजे चौपाया किंवा चौपाई-दोहे. प्रामुख्याने यांत दोन-दोन ओळींचे सूत्रमय दोहे किंवा चालींवर गायली जाणारी जास्त ओळींची पदे येतात. या पदांच्या चाली लोकगीतांवर आधारलेल्या आहेत. या पदांतून जी पुनरावृत्ती आढळते ती कीर्तना-भजनासारख्या सामूहिक गायनाच्या पद्धतीमुळे आलेली असावी. यांतली कुठलीच वृत्ते छंदशास्त्राच्या कठोर नियमांनी बांधलेली नाहीत. त्यांना त्यांचे स्वतंत्र नियम आहेत. कबीर स्वनिर्मित लयीचे आकृतिबंध अनुसरताना दिसतो.

एम. ए. गनी यांनी त्यांच्या *हिस्ट्री ऑफ द पर्शियन लँग्वेज ॲट मुघल कोर्ट* या ग्रंथात म्हटले आहे की, 'हमन है इश्क मस्ताना, हमन को होशियारी क्या' पासून सुरू झालेली सहा ओळींची रचना ही उर्दूतील सर्वांत पहिली गझल असावी. पण हे अजून सिद्ध होऊ शकलेले नाही. दख्खनी उर्दूत या आधीच्या काही गझला आहेत. रामबाबू सक्सेना यांनी *अ हिस्ट्री ऑफ उर्दू लिटरेचर* या ग्रंथात चंद्रभान नावाच्या ब्राह्मणाने लिहिलेल्या गझलेचा उल्लेख केला आहे. कबिराने जरी उर्दू-फारसीतले वृत्त-छंद हाताळलेले नसले तरी त्याने सुफी कलाम ऐकलेले असावेत. कबिराच्या काव्यात आढळून येणारे 'प्रेम' व 'दैवी मदहोशी' यांचे उल्लेख हे सुफी शैलीशी जुळणारे वाटतात.

कबीर काही सावध शहरी कवी नव्हता. त्याला त्याचे हर्षोल्हास, त्याच्या व्यथावेदना, या गोष्टी हाताशी असलेल्या भाषेतून व्यक्त करायच्या होत्या. तो कधी एखाद्या ताशीव शब्दासाठी अडून नाही राहिला. किंवा त्याने कधी रसिकांची वाहवा मिळवण्याची पर्वा केली नाही. म्हणूनच त्याच्या कवितेत एक रांगडा खडबडीतपणा आहे. पण त्यामुळेच त्याच्या काव्याला एक दुर्मीळ सौंदर्यही प्राप्त झाले आहे. कबिराची पद्यरचना साधीशीच पण झपाटून टाकणारी आहे. बहुतेक दोह्यांच्या व पदांच्या शेवटी त्याचे स्वत:चे नाव गुंफलेले आहे.अगणित अनुकरण करणारे आणि असंख्य काव्यशर्विलक यांच्यापासून बचाव करण्यासाठी हा एक प्रकारचा 'कॉपीराइट'चा प्रकार असावा. अस्सलतेची काहीतरी खूण आवश्यक होती. म्हणूनच मध्ययुगातील संतकवींच्या रचनांमध्ये 'मीरा के प्रभु गिरिधर नागर,' किंवा 'तुलसी कहत...' किंवा 'सूर श्याम...' अशा ओळी येतात.

नंतरच्या काळातील हिंदी कवींनी मध्ययुगीन 'आर्यसप्तशती' किंवा 'गाथासप्तशती'च्या धर्तीवर 700 दोहे असलेल्या 'सतसई' नामक अनेक कृतींची रचना केलेली असली, तरी कबिराच्या दोह्यांना त्यांचे असे स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. कबिराला 700 या अंकाच्या जादूचा मोह नव्हता.

## अन्य काव्यगुण

मराठी संत-कवी नामदेव, पंजाबीतले गुरू नानक, तेलुगूमधले वेमना, कन्नड संतकवी बसवेश्वर आणि गुजरातीतील आखो यांच्यात आणि कबिरामध्ये असलेला समान धागा म्हणजे मनाची विशालता आणि मानवता. या सर्वांनी जात, पंथ आणि संप्रदाय यांची बंधने झुगारून दिली. जनमानसावर रूढ धर्माचा जबरदस्त पगडा असण्याच्या त्या काळात ही अतिशय कठीण गोष्ट होती. आता मात्र हिंदी समीक्षेत कबिराला पहिला विद्रोही कवी म्हणून आणि सर्वप्रथम आधुनिकतावादी कवी या नात्याने मानाचे स्थान मिळू लागले आहे. (जून 1966 मध्ये प्रकाशित झालेल्या 'पूरबी टाइम्स'च्या 'कबीर विशेषांका'त यशपाल, संपूर्णानंद, अमृतलाल नागर, अली सरदार जाफ्री, फिराक गोरखपुरी, प्रकाशचन्द्र गुप्ता, इ. चेलीशेव आदींचे लेख आहेत.) एक तरुण समीक्षक ठाकूर प्रसादसिंह यांनी तर संपूर्ण गांभीर्याने कबिराला 'हिंदी भाषेतील विद्रोही कवितेचे पितामह' म्हटले आहे.

कबीर त्याच्या वाचकाला किंवा श्रोत्याला कसा झपाटून टाकतो, हे त्याचे वैशिष्ट्य वरील सर्व लेखांमध्ये अधोरेखित केले आहे. कबीर वाचल्यानंतर माणूस पूर्ववत राहात नाही. कबिराने त्याच्या आत्म्यालाच हात घातलेला असतो. कबीर हे साधतो ते एक विणकर आणि हिंदू व मुस्लिम धर्माभिमान्यांकडून छळ झालेली एक व्यक्ती, या नात्यांनी आलेल्या अनुभवांचे वर्णन करून. या अनुभवांचे तो एका विश्वव्यापी करुणेत रूपांतर करतो. त्याचा व्यक्तिगत निषेधाचा स्वर हा लक्षावधी मूक लोकांचा आवाज बनतो.

फिराक गोरखपुरींच्या मते पूर्व उत्तरप्रदेशातील ग्रामीण जनतेच्या भाषेला कबिराने एक नवा अर्थ दिला. त्यांची बोलीभाषा जणू विजेने भारली गेली. गोरखपुरींनी कबिराने केलेल्या या कायापालटाची अनेक उदाहरणे दिली आहेत. कसलेही पद्धतशीर शिक्षण न घेतलेल्या कबिराने भारतीय साहित्यात मोलाची भर टाकली आहे.

मानवी आयुष्य म्हणजे एक क्षणजीवी अवस्था आहे, असे कबीर मानतो. त्याला टी. एस. इलियट म्हणतात त्या 'मूठभर मातीतल्या भया'ची जाणीव आहे. ही 'गुलाबाला कीड लागल्या'ची भावना त्याच्या दोह्यांतही व्यक्त झाली आहे. 'क्षणार्धात काय घडेल हे सांगता येत नाही. आणि तरीही आपण उद्याचे मनसुबे रचत असतो. आणि अचानक ससाण्याने कबुतरावर झडप घालावी तसा झेपावतो मृत्यू .' 'माळी बागेत शिरल्याबरोबर कळ्यांनी आकांत केला. आज उमललेली फुले खुडली जात आहेत, उद्या आमची पाळी येईल.' माती कुंभाराला म्हणते,' तू काय मला तुडवतोयस, एक दिवस असा येईल की, तू माझ्याकडून तुडवला जाशील.' अशाच अर्थाची एक रूबाई उमरखय्यामच्या 'कूजा-नामा' मध्ये आहे.



गांधीजींनी आपल्या दैनंदिन प्रार्थनेत कबिराच्या खालील पदाचा समावेश केला होता-

मऊ मुलायम विणली चादर
कुठला ताणा कुठली भरणी, कुठल्या धाग्यांनी विणली चादर
इडा-पिंगला ताणा-भरणी, सुषुम्न धाग्यांनी विणली चादर
अष्टकमळ, दशचक्रे डोलती, पंचतत्त्व, त्रिगुणी ही चादर
स्वामी विणाया घेती मास दहा, ठोकठोकुनी विणली चादर
पांघरती ही देव-नर-मुनी, पांघरूनी केली मलिन चादर
कबीर दास वापरी ती जपुनी, परत ठेवी जशी होती चादर [1]

कबीर व्यवसायाने विणकर होता. महात्मा गांधींनीसुद्धा सूतकताई आणि चरखा चालवण्यावर भर दिला होता. भारताचे हे दोन महापुरुष वेगवेगळ्या कालखंडांत आणि वेगवेगळ्या परिस्थितीत कार्यरत होते, पण दोघांमध्ये अनेक बाबतींत कमालीचे साम्य आहे.

कबिराच्या काव्यात आणखी एक मोठा गुण असा आहे की, ते शिळे होत नाही. कबिराने माणसाच्या मूलभूत आकांक्षेवर नेमके बोट ठेवले : 'आंतरिक शांतीचा शोध.' मेळ न जुळलेल्या समाजात कार्य करताना माणसाला काय यातना होतात याकडे त्याने लक्ष वेधले. धर्म जेव्हा कर्मकांडाचे रूप घेतो, तत्त्वज्ञान जेव्हा शाब्दिक मायाजालात आणि भाषिक अवडंबरात परिवर्तित होते, जेव्हा सदसद्विवेकबुद्धी संकटात सापडते, नेतृत्व जेव्हा पंगू झालेले असते, अशा वेळी कबिराचे काव्य फार मोठी प्रेरणा देते. अनेकदा कबीर तथाकथित सुशिक्षित वर्गाचे ढोंग आणि त्याचा दुतोंडीपणा उघडकीला आणून आपल्याला धक्का देऊ पाहतो. पण हे करताना त्यात निराशेचा स्वर नसतो. कबिराचे काव्यजगत म्हणजे अश्रूंची दरी नाही की विरहाची काळरात्र नाही. किंवा पार करता येणार नाही अशी खाई नाही. कबिरापाशी ग्रामीण माणसाचा विद्रोह आणि दणकटपणा आहे. त्याची आशा कोमेजलेली नाही. त्याच्या आशेचे स्रोत आध्यात्मिक आहेत हे खरे आहे. आजच्या मूल्यहीनतेच्या काळात हे फसवे आहे असेही कोणी म्हणेल. पण कबिराची आस्तिकता ज्यांना मान्य नाही त्यांच्यासाठीही कबिराच्या कवितेत खूप काही शिल्लक राहते. कबिराच्या काव्याचा आनंद घेण्यासाठी कबीरपंथी असणे आवश्यक नाही, यातच त्याच्या चिरंतन श्रेष्ठत्वाचे रहस्य दडलेले आहे. कबीर काळ व अवकाशाच्या पार आहे. त्याची काव्यदृष्टी उच्च दर्जाची व विशाल आहे. तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील हिंदुस्थानातल्या राजकीय व्यवस्थेची त्याने पर्वा केलेली दिसत नाही. नित्शेने ज्याला 'हो म्हणणे' म्हटले असते, ते त्याने केले. कुठल्याही काळात हे करायला मोठे धैर्य लागते. कबिरापाशी सत्य सांगण्याचे धाडस होते. आणि त्याचे परिणाम सहन करण्याची हिंमत होती. या कारणांमुळेच कबिराच्या कवितेला तिचे आगळेपण प्राप्त होते. ती रूढींच्या बेड्या तोडत जाते. कबिराची कविता मुक्त आत्म्याची कविता आहे.

❑❑❑

1 'झीनी झीनी बिनी चदरिया' : *शब्दावली*, पृ.74
(मूळ पदासाठी पहा : परिशिष्ट, पद क्र. 11)

### 1 अबिनासी दुल्हा कब मिलिहौ

अबिनासी दुल्हा कब मिलिहौ, भक्तन के रछपाल ।।

जल उपजी जल ही सों नेहा, रटत पियास पियास ।
मैं ठाढी बिरहन मग जोऊँ, प्रियतम तुमरी आस ।।

छोडे गेह नेह लगि तुम सों, भई चरन लवलीन ।
ताला-बेलि होति घर भीतर, जैसे जल बिन मीन ।।

दिवस न भूख रैन नहिं निद्रा, घर अँगना न सुहाय ।
सेजिरिया बैरिन भइ हमको, जागत रैन बिहाय ।।

हम तो तुमरी दासी सजना, तुम हमरे भरतार ।
दीन-दयाल दया करि आओ, समरथ सिरजनहार ।।

कै हम प्रान तजति हैं प्यारे, कै अपनी कर लैव ।
दास कबीर बिरहा अति बाढेव, हमको दरसन देव ।।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.329

### 2. तलफै बिन बालम मोर जिया ।

तलफै बिन बालम मोर जिया ।

दिन नहिं चैन रात नहिं निंदया,
तलफ तलफ के भोर किया ।।

तन-मन मोर रहँट-अस डोलै,
सून सेज पर जनम छिया ।।

नैन थकित भये पंथ न सूझै,
साँई बेदरदी सुध न लिया ।।

कहत कबीर सुनो भाई साधो,
हरो पीर दुख जोर किया ।।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 329

## 4
## काव्यानुवाद

### 1. अविनाशी भ्रतार मिळेल कधी मज

अविनाशी भ्रतार मिळेल कधी मज, भक्तांच्या राखणदारा रे ।।

जळी उपजले, जळात रमले, तरीही तृषेने व्याकुळते
आस धरूनी तुझी प्रिया रे विरहिणी मी वाट पाहते

लीन जाहले तुझ्याच चरणी, जीव जडे, घर सुटले रे
पाण्याविन जशी मासोळी, तळमळते मी या घरात रे

नीज न रात्री, अन्न न जाई, सुख ना लागे घरी-अंगणी
वैरीण होई शेज आम्हाला, सरते ही कशी रात्र जागूनी

मी तर दासी तुझी साजणा, तू माझा असशी भ्रतार
दया करी रे दीनदयाळा, तू समर्थ सृजनहार

का त्यजू मी हे प्राण प्रिया, वा तू मज अपुली करून घे
दास कबीर म्हणे विरह अती वाढे, तू आम्हाला दर्शन दे

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.329

### 2. सजणाविना जीव झुरे ग बाई

सजणाविना जीव झुरे ग बाई

दिवसा ना चैन, रात्री झोप नाही
तळमळताना पहाट होई

तनमन माझे, उचंबळे रहाटापरी
जन्म गेला वाया सुन्या शेजेवरी

थकले रे नेत्र, मार्ग दिसेना काही
बेदर्दी स्वामी ना दखलही घेई

कबीर म्हणे, ऐक रे साधूभाई
दु:खाने जोर केला शमवी पीडा ही

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 329

### 3. पिया मिलन की आस

पिया मिलन की आस रहों कब लौं खरी।
ऊँचे नहिं चढि जाय, मने लज्जा भरी॥
पाँव नहीं ठहराय, चढूँ गिर-गिर परूँ।
फिर फिर चढइँ सँम्हारि, चरन आगे धरूँ॥
अंग अंग थहराइ, तो बहुविधि डरि रहूँ।
करम -कपट मग घेरि, तो भ्रम में परि रहूँ॥
वारि निपट अनारि, वे तो झीनी गैल है।
अटपट चाल तुम्हार, मिलन कस होई है॥
छोरो कुमति-विकार, सुमति गहि लीजिये
सतगुरु शब्द सम्हारि, चरन चित्त दीजिये॥
अन्तरपट दे खोल, शब्द उर लावरी।
दिलबिच दास कबीर, मिलैं तोहिकों बावरी॥

### 4. अपनपौ आपुही तै बिसरो।

अपनपौ आप ही बिसरो।
जैसे सोनहा काँच मंदिर मैं भरमत भूकि मरो।
जो केहरि बपु निरखि कूल-जल प्रतिमा देखि परो।
ऐसे हिं गज फटिक सिला पर दसननि आनि अरो।
मरकट मुठी स्वाद ना बिसुरै घर घर नटत फिरो।
कह कबीर ललनी कै सुवना तोहि कवन पकरो॥

-*शब्दावली* (भाग 2) : बेलवेडियर प्रेस, पृ. 110

### 5. ऐसा भेद बिगूचन भारी।

ऐसा भेद बिगूचन भारी।
बेद कतेब दीन अरू दुनियाँ, कौन पुरुष कौन नारी॥
एक बूंद एकै मल मूतर, एक चाँम एक गूदा।
एक जोति थै सब उतपनाँ, कौन बाम्हन कौन सूदा॥
माटि का प्यंड सहजि उतपनाँ, नाद रू ब्यंद समाँनां।
बिनति गयाँ थैं का नाँव धरिहौ, पढि गुनि भ्रम जानां॥
रज गुन ब्रम्हा तम गुन संकर, सत गुन हरि है सोई।
कहै कबीर एक राँम जपहु रे, हिंदू तुरक न कोई॥

-*कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 178



### 3. प्रियाच्या मिलनाची आस

केव्हाची मी उभी, धरून प्रियाच्या मिलनाची आस
शिखरावर ना येई चढता, मनास वाटे लाज
ठरे न पाऊल, चढू जाते परि पुन्हा पुन्हा कोसळते
पुन्हा पुन्हा फिरूनी सांभाळून, पाय पुढे टाकते
अंग अंग थरथरते, अगणित शंका, भिऊन जाते
कर्म-कपट घेरते, तशी मी भ्रमात की राहते
बालिका निष्कपट अजाण, रस्ता अरुंद बाई
चाल तुझी लटपटते, मिलन कसे होई
सोड कुबुध्दी-विकार, सुबुध्दी ग्रहण कर
सद्‌गुरूचा शब्द पाळ, चित्त असो चरणांवर
उघडून दे अंतर्पट, शब्दाला घे उरी
कबीर म्हणे बावरी, मिळेल तुला तो अंतरी

### 4. आपणाला आपलाच विसर पडे

आपणाला आपलाच विसर पडे
श्वान भ्रमे जसा शीशमहाली अन् भुंकून मरे
सिंह जसा भुलूनी प्रतिबिंबा विहिरीमध्ये पडे
गजही तसाच स्फटीकशिलेवर परजून दात लढे
मुठीत मिठाई असून मर्कट घरोघरी नाचत फिरे
कबीर म्हणे शुक रानातील तू, कोण तुला पकडे

-*शब्दावली* (भाग 2): बेलवेडियर प्रेस, पृ.110

### 5. असा भेद हा भ्रामक भारी

असा भेद हा भ्रामक भारी
वेद-कुराण-धर्म अन् दुनिया, कोण पुरुष कोण नारी॥
तीच चामडी तेच गुदद्वार, मलमूत्रही तेच, नसती दोन
एका ज्योतीतून सर्वही उपजे, ब्राह्मण कोण, शूद्र कोण
मातीतून घडा सहज निपजे, नाद व बिंदू सामावून
फुटे घडा त्याचे काय नाव, पढतमूर्खा भ्रम घे जाणून
रज-गुणी ब्रह्मा, तम-गुणी शंकर, हरी असे सत-गुणी
कबीर म्हणे करी रामजप रे, हिंदू-मुस्लिम ना कोणी

-*कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 178

**6. तोको पीव मिलेंगे**

तोको पीव मिलेंगे, घूँगट के पट खोल रे।
घट-घट में वही साईं रमता, कटुक बचन मत बोल रे।
धनजोबन की गरब न कीजै झूठा पचरँग चोल रे।
सुन्न महल में दियना बार ले, आसा सों मत डोल रे।
जोग जुगत सो रंगमहल में, पिय पाई अनमोल रे।
कहैं कबीर आनंद भयो हैं, बाजत अनहद ढोल रे ॥

- *कबीर* :हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 350

**7. रहना नहिं देस बिराना है।**

रहना नहिं देस बिराना है।
यह संसार कागज की पुडिया, बूँद पडे घुल जाना है।
यह संसार काँट की बाडी, उलझ-पुलझ मरि जाना है।
यह संसार झाड औ झाँखर, आग लगे बरि जाना है।
कहत कबीर सुनो भाई साधो, सतगुरू नाम ठिकाना है ॥

-*कबीर* :हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 308

**8. बुढिया हँसि बोली।**

बुढिया हँसि बोली।
(बुढिया) हँसि बोले मैं नितहीं बारि मोसों कहु तरुनी कवनि नारि ॥
दाँत गयल मोर पान खात, केस गयल मोर गंग न्हात।
नयन गयल मोर कजरा देत, बयस गयल पर-पुरुष लेत ॥
जान पुरुषवा मोर अहार, अनजाने का करों सिंगार।
(कहहिं) कबीर बुढिया आनंद गाय, पूत भतारहि बैठि खाय ॥

-*कबीर बीजक* : (सं.) वासुदेवसिंह, पृ.184



**6. तुज मिळेल प्रियतम**

तुज मिळेल प्रियतम, घुंगटपट तू खोल रे
घटाघटातून रमतो स्वामी, कटुवचना ना बोल रे
धन- यौवनाचा गर्व ना धरी, वसन पंचरंगी फोल रे
शून्यमहाली लाव दिवा तू, आशेने नच डोल रे
रंगमहाली जागत सुयोगे, मिळे सजण अनमोल रे
कबीर म्हणे आनंद जाहला, धुमे अनाहत ढोल रे

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 350

**7. देश परका हा, मज नाही राहणे**

देश परका हा, मज नाही राहणे
ही दुनिया रे कागदी पुडी, पडता थेंब चुरगळून जाणे
ही दुनिया काटेरी जाळी, गुंतून-फसून मरून जाणे
ही दुनिया झुडपे अन् झाडे, आग लागता जळून जाणे
सद्गुरू -नाम हाच विसावा, ऐक साधूभाई, कबीर म्हणे

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 308

**8. म्हातारी बोलते हसून**

म्हातारी बोलते हसून
हसून बोलते मी नित्य बालिका, माझ्यापेक्षा कोण नारी, कोण तरुण ॥
पान खाऊन माझे दात गेले, केस गेले न्हाऊन गंगेत
काजळामुळे डोळे गेले, वय गेले परपुरुषांना घेत
जाण हे की मला पुरुष आहार, अपरिचितांसाठी करते शृंगार
कबीर म्हणतो गाई ती आनंदे, बसून खाई पुत्र-भ्रतार

-*कबीर बीजक* : (सं.) वासुदेवसिंह, पृ. 184

**9. माया महा ठगिनी हम जानी।**

माया महा ठगिनी हम जानी।
तिरगुन फाँसि लिये कर डोलै, बोलै मधुरा बानी॥
केशव के कमला होइ बैठी, सिव के भवन भवानी।
पंडा के मूरत होइ बैठी, तीरथ हू में पानी॥
जोगी के जोगिन होइ बैठी, राजा के घर रानी।
काहू के हीरा होइ बैठी, काहू के कौडी कानी॥
भक्तन के भक्तिन होइ बैठी, ब्रह्मा के ब्रह्मानी।
कहैं कबीर सुनो भाई साधो, यह सब अकथ कहानी॥

-*शब्द 59, कबीर साहब की बीजक* : बेलवेडियर प्रेस, पृ. 52,53

**10. लावौ बाबा आगि**

लावौ बाबा आगि जलाओ घरा रे।
ता कारनि मन धंधे परा रे॥
इक डाइनि मेरे मैं बसैं रे।
नित उठि मेरे जिय को डसैं रे।
या डाँइन के लरिका पाँच रे।
निस दिन मोहि नचावै नाँच रे।
कहै कबीर हँ ताकौ दास,
डाँइन के सँगि रहै उदास॥

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 311

**11. अरे इन दोउन राह न पाई।**

अरे इन दोउन राह न पाई।
हिंदू अपनीं करे बडाई गागर छुवन न देई।
वेस्या के पायन तर सोवै यह देखो हिंदुआई॥
मुसलमान के पीर-औलिया मुर्गी मुर्गा खाई।
खाला केरी बेटी ब्याहैं घरहि में करै सगाई॥
हिंदुन की हिंदुवाई देखी तुरकन की तुरकाई।
कहै कबीर सुनो भाई साधो कौन राह हम जाई॥



**9. माया महा-ठगिणी मी जाणी**

माया महा-ठगिणी मी जाणी
त्रिगुणी फास हाती धरून डोले, बोले मधुर वाणी॥
केशवासाठी कमला होई, शिवासाठी भवानी
पंडितासाठी मूर्ती झाली, तीर्थामधले पाणी
जोग्यासाठी जोगीण होई, राजगृही ती राणी
कोणासाठी तुटकी कवडी, कोणाला हिरकणी
भक्तासाठी भक्तीण होई, ब्रह्म्याची ब्रह्मिणी
कबीर म्हणे ऐक रे साधूभाई, ही सर्व अकथ्य कहाणी

-*शब्द 59, कबीर साहब की बीजक* : बेलवेडियर प्रेस, पृ. 52

**10. आण बाबा अग्नी**

आण बाबा अग्नी घर हे जाळी रे
ज्यास्तव मन गुंते व्यवहारी रे
डाकीण एक ती मनी वसे रे
नित उठून आत्म्यास डसे रे
डाकिणीला या लेक पाच रे
नाचवती मज दिवसरात रे
कबीर म्हणे मी त्याचा दास
डाकिणीसंगे राही उदास

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 311

**11. अरे या दोघांना मार्ग कळत नाही**

अरे या दोघांना मार्ग कळत नाही
हिंदू आपली करे बढाई, घागर शिवू न देई
वेश्येचरणी काढी रात्र, हिंदुत्व याचे पाही
मुसलमानांचा पीर अवलिया, मांस- मुरगी खाई
कुटुंबामध्येच ठरवी लग्न, मावशीघरी मुलगी देई
हिंदूंचे हिंदुत्व पाहिले, तुर्कांची तुर्काई
कबीर म्हणे ऐक आणि जाण, कुठली वाट घ्यावी

**12. ना जाने साहब कैसा है ।**

ना जाने साहब कैसा है

मुल्ला होकर बाँग जो देवे
क्या तेरा साहब बहरा है ।।
कीडी के पग नेवर बाजे
सो भी साहब सुनता है ।।

माला फेरी तिलक लगाया
लंबी जटा बढाता है ।।
अंतर तेरे कुफर-कटारी
यों नहिं साहब मिलता है ।।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 272

**13. पंडित बाद बदंते झूठा ।**

पंडित बाद बदंते झूठा ।
राम कह्याँ दुनियाँ गति पावै, खांड कह्याँ मुख मीठा ।।
पावक कह्याँ पाव जे दाझै, जल कहि त्रिषा बुझाई ।।
भोजन कह्याँ भूख जे भाजै, तो सब कोई तिरि जाई ।।
नर कै साथि सूवा हरि बोलै, हरि परताप न जानै ।
जो कबहूँ उडि जाइ जंगल में बहुरि न सुरतै आनै ।।
साँची प्रीति विषै माया सूँ, हरि भगतनि-सूँ दासी ।
कहै कबीर प्रेम नहिं उपज्यौ, बाँध्यो जमपुरि जासी ।।

-*कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 170

**14. नाहीं धरमी, नाहीं अधरमी**

नाहीं धरमी, नाहीं अधरमी, ना मैं जती न कामी हो ।
ना मैं कहता ना मैं सुनता, ना मैं सेवक-स्वामी हो ।
ना मैं बंधा ना मैं मुक्ता, ना मैं बिरत न रंगी हो ।
ना काहू से न्यारा हुआ, ना काहू के संगी हो ।
ना हम नरक-लोक को जाते, ना हम सुर्ग सिधारे हो ।
सब ही कर्म हमारा कीया, हम कर्मन तें न्यारा हो ।
या मत को कोई बिरले बूझै, सो अटर हो बैठे हो ।
मत कबीर काहू को थापै, मत काहू को मेटे हो ।

-*कबीर*: हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 279



**12. न कळे कसा देव असे**

न कळे कसा तव देव असे

मुल्ला होऊन बांग जी देशी
देव तुझा का बहिरा असे
मुंगीच्या पायी घुंगूर वाजे
तोही देव ऐकतसे

जपमाळ धरशी टिळा लावशी
जटा लांब तू वाढवशी
अंतरी परी अश्रद्धेची सुरी
देव असा ना पावतसे

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 272

**13. पंडित मारती साऱ्या बाता**

पंडित मारती साऱ्या बाता
राम म्हणता दुनिया गती घेई, होई मुख गोड साखर म्हणता ।।
जळ म्हणता तहान भागे, पावक म्हणता भाजे अग्नी
भोजन म्हणता भूक जर भागे, जातील तर रे सारे तरूनी
मनुजासंगे शुक हरी बोले, हरीचे प्रताप ना जाणी
उडून जाता परि अरण्यी, मुखी न आणी हरी फिरूनी
दाखवण्या हरिभक्तांचा दास, प्रीत खरी विषय-मायेशी
कबीर म्हणे जर प्रेम ना उपजे, बांधून यमपुरी जाशी

-*कबीर ग्रंथावली* : (सं.) माताप्रसाद गुप्त, पृ. 170

**14. ना मी धर्मी, नाही अधर्मी**

ना मी धर्मी, नाही अधर्मी, ना मी यती ना कामी हो
ना मी सांगत, ना मी ऐकत, ना मी सेवक-स्वामी हो
बंधनात ना, मुक्तही नाही, विरक्त ना, ना रंगलो
नाही अलगलो कोणापासून, ना कोणाला बिलगलो
स्वर्गलोकी ना जाऊ आम्ही, नरकही ना आम्हाला हो
सर्व कर्म ते आमचेच खरे, कर्म नि आम्ही न्यारे हो
मत हे कोणा विरळचि उमजे, बैठक त्याची निश्चल हो
कबीर ना स्थापी कसलेही मत, नष्ट करी ना कुठले हो

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी,पृ. 279

**15. संतन जात न पूछो**

संतन जात न पूछो निरगुनिया
साध ब्राह्मन साध छत्तरी, साधै जाती बनियाँ।
साधनमाँ छत्तीस कौम है, टेढी तोर पुछनियाँ।
साधै नार साधै धोबी साधै जाति है बरियाँ।
साधनमाँ रैदास सन्त हैं, सुपच ऋषि सो भंगियाँ।
हिन्दू-तुर्क दुई दीन बने है, कछू नही पहचनियाँ।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.279

**16. तेरा मेरा मनुआ कैसे**

तेरा मेरा मनुआ कैसे इक होई रे।
मैं कहता हौं आँखिन देखी, तू कहता कागद की देखी।
मैं कहता सुरझावन हारी, तू राख्यौ उरझाई रे।
मैं कहता तू जागत रहियो, तू रहता है सोई रे।
मैं कहता निर्मोही रहियो, तू जाता है मोही रे।
जुगन जुगन समुझावत हारा, कही न मानत कोई रे।
तू तो रंडी फिरे बिहंडी, सब धन डारे खोई रे।
सतगुरु धारा निर्मल बाहै, बामैं काया धोई रे।
कहत कबीर सुनो भाई साधो, तब ही वैसा होई रे।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 324

**17. मोको कहाँ ढूँढे बंदे**

मोको कहाँ ढूँढे बंदे, मैं तो तेरे पास में।
ना मैं छगरी, ना मैं भेंडी, ना मैं छुरी गँडास में।
नहीं खाल में, नही पूँछ में ना हड्डी ना माँस में।
ना मैं देवल ना मैं मस्जिद, ना काबै कैलास में।
ना तो कौन क्रिया-कर्म में, नहीं योग बैराग में।
खोजी होय तो तुरतै मिलिहौं, पल-भर की तालास में।
कहैं कबीर सुनो भाई साधो, सब स्वाँसों की स्वाँस में।

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.230



**15. नका विचारू जात साधूची**

नका विचारू जात निर्गुणी साधूची ॥
साधू ब्राह्मण, क्षत्रिय साधू, साधू असती वैश्यही
छत्तीस जाती साधूंच्या, पृच्छा तुझी वाकडी
साधू नाभिक, सुतार साधू, साधू असती धोबी
संत रोहिदास साधूंमध्ये, साधू सुपच ऋषीही
हिंदू आणि मुस्लिम साधू, फरक करी ना कोणीही

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 231

**16. तुझे माझे मानस**

तुझे माझे मानस कैसे होईल एक रे
मी म्हणतो मी डोळां पाही, विसंबिशी तू पुस्तकी रे
दाखवी मी सुटकेचे मार्ग, अडकुनी तू गुंत्यातच रे
सांगे मी तू जागृत राही, निजून कसा तू राहशी रे
मी म्हणतो तू हो निर्मोही, तू मोहातच गुंतून रे
युगे युगे समजाऊन हरलो, कोणी न काही मानी रे
वेश्येसम तू सर्व नाशिसी, धन तू दवडिले सारे रे
सद्गुरू निर्मळ धारा वाही, स्वच्छ करी तव काया रे
कबीर म्हणे ऐक साधूभाई, तेव्हाच तसा तू होशील रे

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 324

**17. कुठे शोधिसी मला सेवका**

कुठे शोधिसी मला सेवका, मी तर तुझ्याच जवळी ॥
बकरीत ना मी मेंढीत नाही, सुरीत ना मी विळ्यात ना
कातडीत वा शेपटीत ना, ना मांसात, हाडात ना
देवळात ना मी, नाही मशिदी, ना काबा अन् कैलासात
कर्मकांडी ना मी कसल्याही, ना योगी ना वैराग्यात
शोधिलेस तर मिळेन क्षणी मी, क्षणभरच्या शोधात
कबीर म्हणे ऐक रे साधूभाई, सर्व श्वासांच्या श्वासात

-*कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी, पृ.230

### 18. कबीर के दोहे

भारी कहौं तो बहू डरौं, हलका कहौं तो झूठा।
मैं का जांणों रामकूँ, नैनहूँ कबहूँ न दीठा ॥

ऐसा अदभुत जिनि कथै, अदभुत राखि लुकाई।
वेद कुरानौं गमि नहीं, कह्याँ न को पतिआई ॥

करता की गति अगम है, तूँ चल अपणै उनमान ॥
धीरैं धीरैं पाँव दे, पहुँचैंगे परवान ॥

नैनन की करि कोठरी, पुतरी पलंग बिछाय।
पलकों की चिक डारि कै पिय को लिया रिझाय ॥

प्रीतम को पतिया लिखूँ, जो कहूँ होय बिदेस।
तन में मन में नैन में, ताकौ कहाँ संदेस ॥

परबति परबति मैं फिर्या, नैन गँवाए रोइ।
सो बूटी पाऊँ नही, जातै जीवन होइ ॥

नैन हमारे जलि गए, छिन छिन लोडै तुज्झ।
नाँ तूं मिलै न मैं खुशी ऐसी बेदन मुज्झ ॥

सुखिया सब संसार है, खाये अरु सोवै।
दुखिया दास कबीर जागे अरु रोवै ॥

□□□



### 18. कबिराचे दोहे

भारी म्हणू तर फार घाबराल, खोटे जर हलका म्हटले
कुठे मी जाणतो रामाला,डोळां कधी न पाहिले

ऐसा अद्भुत म्हणती सारे, अद्भुत लपवून ठेवी तो
वेद-कुराणांना ना उमजे, काहीही बाता सांगू नको

अगम्य गती ती कर्त्याची, चाल आपल्या गतीने ठाम
पाऊल टाक हळूहळू तू, गाठशील मुक्काम

नयनांचा करून महाल, पुतळ्यांचा पलंग केला
वर पडदा तो पापण्यांचा, रिझविले असे प्रियाला

परदेशी जर असेल तो, तर पत्र लिहिन सजणाला
देहि वसे अन् नेत्री-मनी, संदेश देऊ कुणाला

पर्वत पर्वत फिरलो मी, रडून वेचले नयन
औषधी मज ती ना मिळे, जिच्यात वसे जीवन

जळून गेले नेत्र क्षणोक्षणी, आठवताना तुजला
तू ना लाभसी ना आनंद, अशी वेदना मजला

खाते आणि निजते, सारे जग राहते सुखी
जागतो आणि रडतो, कबीरदास तो दुःखी

□□□

# परिशिष्ट

( या पुस्तकाच्या पहिल्या तीन प्रकरणांमध्ये ज्यांचा उल्लेख आलेला आहे, अशी कबिरांची पदे मूळ व पूर्ण स्वरूपात पुढे देत आहोत - भाषांतरकार.)

**1. शब्द को खोजि ले**

शब्द को खोजि ले शब्द को बूझि ले शब्द ही शब्द तू चलो भाई।
शब्द अकास है शब्द पाताल है शब्द ते पिंड ब्रह्मांड छाई ॥
शब्द बयना बसै शब्द सरवन बसै शब्द के ख्याल मूरति बनाई।
शब्द ही वेद है शब्द ही नाद है शब्द ही शास्त्र बहु भाँति गाई ॥
शब्द ही यंत्र है शब्द ही मंत्र है शब्द ही गुरू सिख को सुनाई।
शब्द ही तत्व है शब्द नि:तत्व है शब्द आकार निराकार भाई॥
शब्द ही पुरूख है शब्द ही नारि है शब्द ही तीन देवा थपाई।
शब्द ही दृष्ट अनदृष्ट ओंकार है शब्द ही सकल ब्रह्मांड जाई ॥
कहैं कबीर तैं शब्द को परिख ले शब्द ही आप करतार भाई ॥

-*कबीर वचनावली* : (सं.) अयोध्यासिंह उपाध्याय 'हरिऔध' पृ. 189.

**2. साधो, ब्रह्म अलख लिखाया**

साधो, ब्रह्म अलख लखाया, जब आप आप दरसाया।
बृच्छ-मद्ध ज्यों बृच्छा दरसै, बृच्छा मद्धे छाया ॥
ज्यों नभ मद्धे सुन्न देखिये, सुन्न अनन्त आकारा।
नि:अच्छरते अच्छर तैसे, अच्छर छर बिस्तारा ॥
ज्यों रबि मद्धे किरन देखिये, किरन मद्ध परकासा।
परमातम में जीव ब्रह्म इमि, जीव मद्ध तिमि स्वाँसा ॥
स्वाँसा मद्धे शब्द देखिये, अर्थ शब्द के माहीं।
ब्रह्म ते जीव जीव ते मन यों, न्यारा मिला सदा ही ॥
आपहि बृच्छ बीज अंकूरा, आप फूल फल छाया।
आपहि सूर किरन परकासा, आप ब्रह्म जिउ माया ॥
अनन्ताकार सुन्न नभ आपै, स्वाँस शब्द अरथाया।
नि:अच्छर अच्छर छर आपै, मन जीव ब्रह्म समाया ॥
आतम में परमातम दरसे, परमातम में झाँई।
झाँई में परछाईं दरसै, लखै कबीरा साँई ॥

**3. साधो, शब्द-साधना कीजै**

साधो, शब्द-साधना कीजै
जे हि शब्द ते प्रगट भये सब, सोई शब्द गहि लीजै ॥
शब्द गुरु शब्द सुन सिख भये, शब्द सो बिरला बूझै।
सोई शिष्य सोई गुरु महातम, जेहिं अन्तर गति सूझै ॥
शब्दै वेद पुरान कहत हैं, शब्दै सठ ठहरावैं।
शब्दै सुर-मुनि-सन्त कहत हैं, शब्द-भेद नही पावैं ॥
शब्दै सुन सुन भेष धरत हैं, शब्दै कहैं अनुरागी।
षट-दर्शन सब शब्द कहत हैं, शब्दैं कहैं बैरागी ॥
शब्दै काया जग उतपानी, शब्दै केरि पसारा।
कहैं कबीर जहँ शब्द होत हैं, भवन भेद हैं न्यारा ॥

**4. वेद बिबर्जित भेद बिबर्जित**

वेद बिबर्जित भेद बिबर्जित, बिबर्जित पाप रू पुंन्यं।
ग्यांन बिबर्जित ध्यान बिबर्जित, बिबर्जित अस्थूल सुंन्यं ॥
भेष बिबर्जित भीख बिबर्जित, बिबर्जित ड्यंभक रूपं।
कहै कबीर तिहं लोक बिबर्जित, ऐसा तत्त अनूपं ॥

**5. भूखे भगति न कीजै**

भूखे भगति न कीजै। यह माला अपनी लीजै ॥
हौ माँगो संतन रैना। मैं नाही किसी का देना ॥
माधव कैसी बनै तुम संगे। आप न देउ तले बहुमंगे ॥
दुइ सेर माँगो चूना। पाव घीउ संग लूना ॥
अधसेर माँगो दाले। मोकौ दोनों बखत जिवाले ॥
खाट माँगौ चौपाई।सिरहाना और तुलाई ॥
ऊपर कौ माँगौ खीधा। तेरी भगति करै जनु बींधा ॥
मैं नाही कीता लब्बो। इक नाउ तेरा मैं फब्बो ॥
कहि कबीर मन मान्या। मन मान्या तो हरि जान्या ॥

**6. अलह राम जीउँ तेरे नांई।**

अलह राम जीउँ तेरे नांई
बन्दे परि मिहर करौ मेरे सांई ॥
क्या ले माटी मुँइ सूँ मारै, क्या जल देह न्हवायें।
जोर करे मसकीन सतावै, गुंन ही रहैं छिपायें ॥

क्या तू जू जप मंज़न कीयें, क्या मसीती सिर नायें।
रोजा करें निमाज गुजारें, क्या हज काबै जायें ॥
ब्राह्मण ग्यारसि करै चौबीसों, काजी माह रमजांन।
ग्यारह मास जुदे क्यूँ कीये, एकहि माँहि समांन ॥
जौर खुदाई मसीति बसत है, दुहुँ मैं किनहुँ न हेरा।
पूरिब दिसा हरि का बासा, पछिम अलह मुकांमां ॥
दिल ही खोजि दिलैं दिल भीतरि इहाँ राम रहिमाना ॥

**7. जो खोदाय मसजीद**

जो खोदाय मसजीद बसत है और मुलुक केहि केरा।
तीरथ-मूरत राम-निवासी बाहर करे को हेरा।
पूरब दिसा हरी कौ वासा, पच्छिम अलह मुकाना।
दिल में खोज दिलहिं में खोजौ, इहै करीमा रामा।
जेते औरत-मरद उपसी सो सब रूप तुम्हारा।
कबीर पोंगडा अलह-राम का सो गुरु-पीर हमारा ॥

**8.तीरथ में तो सब पानी है**

तीरथ में तो सब पानी है, होवे नहीं कछु अन्हाय देखा।
प्रतिमा सकल तो जड है भाई, बोलें नहीं बोलाय देखा ॥
पुरान कुरान सबै बात है, या घट का परदा खोल देखा।
अनुभव की बात कबीर कहैं, यह सब है झूठी पोल देखा ॥

- *कबीर* : हजारीप्रसाद द्विवेदी पृ. 262

इंग्रजी भाषांतर : *वन हंड्रेड पोएम्स ऑफ कबीर*, रवीन्द्रनाथ टागोर,पृ. 50

**9. ऐसा अद्‌भुत मेरे गुरि कथ्या**

ऐसा अद्‌भुत मेरे गुरि कथ्या, मैं रह्या उभैषे
मूसा हसती सौं लडे, कोई बिरला पेषै ॥
मूसा पैठा बाँबि म लारै सापणि धाई।
उलटि मूसै सापणि गिली, यहु अचिरज भाई ॥
चींटी परबत उषण्यां, ले राख्यौं चौडे।
मुर्गा मिनकी सूँ लडै, झल पाँणी दौडे ॥
सुरहीं चूषै बछतलि, बछा दूध उतारै।
ऐसा नवल गुंणीं भया, सारदूलहि मारै ॥
भील लुक्या बन बीझ मैं सास सर मारै।
कहै कबीर ताहि गुर करौ, जो या पदहि बिचारै ॥



**10. सन्तो, जागत नींद न कीजै**

सन्तो, जागत नींद न कीजै।
काल न खाय, कल्प नहिं ब्यापै, देह जरा नहिं छीजै ॥
उलटि गंग समुद्रहिं सोखै ससि औ सूर गरासै।
नवग्रह मारि रोगिया बैठे जल में बिंब प्रकासै ॥
बिनु चरणन को दस दिसि धावै, बिन लोचन जग सूझै।
ससा सो उलटि सिंह को ग्रासै, ई अचरज कोउ बूझै ॥
औंधे-घडा नहीं जल डूबै, सूधे सों घट भरिया।
जेहि कारण नर भिन्न भिन्न, कुरू गुरुप्रसाद तें तरिया ॥
पैठि गुफा में सब पद देखै, बाहर कछुक न सूझै।
उलटा बान पारिधिहि लागे, सूरा होय सो बूझै ॥
गायन कहै, कबहु नहिं गावै, अनबोला नित गावै।
नटवर बाजी पेखनी पेखै, अनहद हेतु बढावै ॥
कथनी-वदनी निजुकै जोहैं, ई सब अकथ कहानी।
धरती उलटि आकासहिं बेधैं, ई पुरुषहिं की बानी ॥
बिनां पियाला अमृत अचवै, नदी नीर भरि राखै।
कहै कबीर सो जुग जुग जीवै, राम-सुधारस चाखैं ॥

**11. झीनी झीनी बीनी चदरिया**

झीनी झीनी बीनी चदरिया।
काहै कै ताना काहै कै भरनी, कौन तार से बीनी चदरिया।
इंगला-पिंगला ताना भरनी, सुखमन तार से बीनी चदरिया।
आठ कँवल दल चरखा डोलै, पाँच तत्त्व गुन तीनी चदरिया।
साई को सियत मास दस लागै, ठोक ठोक के बीनी चदरिया।
सो चादर सुर-नर-मुनि ओढि, ओढि के मैली कीनी चदरिया।
दास कबीर जतन से ओढि, ज्यों के त्यों धर दीनी चदरिया ॥

❑❑❑

# ग्रंथसूची

## कबीर-रचित व कबीरविषयक ग्रंथांची सूची


**(अ) कबिराच्या रचना**

1. *अखरावली* : बेलवेडियर प्रेस, अलाहाबाद, 1913
2. *अनुराग सागर* : गुलशन-ए-पंजाब प्रेस, रावळपिंडी, 1902
3. *अनुराग सागर* : विश्वेश्वर प्रेस, बनारस, 1929
4. *आत्मबोध* : सुखरामदास मधीरसिंह, हैद्राबाद, 1901
5. *उपदेशरत्नावली* : भारत बंधू प्रेस, अलीगढ, 1882
6. *एकोत्तरशक* : वेंकटेश्वर प्रेस, मुंबई, 1920
7. *कबीर* : (सं.) वियोगी हरि , 'सस्ता साहित्य मंडल', दिल्ली, 1950
8. *कबीर के शब्द* : पुस्तक मंदिर, मथुरा
9. *कबीर ग्रंथावली* : इंडिया प्रेस, अलाहाबाद, 1928.
10. *कबीर ग्रंथावली* : (संपादित, प्रस्तावनेसहित ) श्यामसुंदर दास, पाचवी आवृत्ती, काशी नागरी प्रचारिणी सभा, 1951
11. *कबीर ग्रंथावली* : पारसनाथ तिवारी (1957 मध्ये स्वीकारलेला शोध-प्रबंध), विश्वविद्यालय प्रकाशन, अलाहाबाद,1961
12. *कबीर ग्रंथावली सटीक* : पुष्पपाल सिंह, अशोक प्रकाशन, दिल्ली, 1962
13. *कबीर दर्पण* : सेतवली मोहम्मद पीर मोहम्मद, मुंबई,1898
14. *कबीर दोहावली* : (सं.) महेंद्रकुमार जैन, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, अलाहाबाद, 1952
15. *कबीर बीजक (मूल)* : पुस्तक मंदिर, मथुरा
16. *कबीर वचनामृत* : (सं.) मुंशीराम शर्मा, दुसरी आवृत्ती, आचार्य शुक्ल साधना सदन, कानपूर, 1955
17. *कबीर वचनावली* : (सं.) अयोध्यासिंह उपाध्यास 'हरिऔध', दुसरी आवृत्ती, नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी, 1920
18. *कबीर संग्रह* : (सं.) सीताराम चतुर्वेदी, पाचवी आवृत्ती, हिंदी साहित्य संमेलन, अलाहाबाद, 1964
19. *कबीर साखी संग्रह* : बेलवेडियर प्रेस, अलाहाबाद, 1912





20. *कबीर- साखी-सार* : (सं.) तारकनाथ बाली, भाष्य : रामवसिष्ट, विनोद पुस्तक मन्दिर, आग्रा, 1956
21. *कबीर-सागर* : (सं.) युगलानंद, वेंकटेश्वर प्रेस, मुंबई,1806
22. *कबीर साहब का बीजक ग्रंथ*: (सं.) मोतीदास चेतनदास, भाष्य : प्रकाश मणिराम साहेब, स्वसंवेद कार्यालय, बडोदे, 1955
23. *कबीर-बोध* : भगवानदास रामजी, येवला, 1892
24. *बीजक कबीरदास* : विश्वनाथसिंह यांचे भाष्य, मोहनलाल भार्गव, लखनौ,1915
25. *बीजक भाष्य* : सदाफलदेव यांचे भाष्य, मुक्ती पुस्तकालय, बलिया, 1956
26. *बीजक मूल* : भार्गव पुस्तकालय, बनारस
27. *बीजक वाणी* : बहरामजी फिरोजशाह मदान, मुंबई, 1810
28. *बोधसागर* ; (सं.) युगलानंद (भाग 1-6), वेंक्टेश्वर प्रेस, मुंबई, 1906
29. *भणित प्रकाश* : (सं.) परमानंद साधू, कोहिनूर प्रेस, लाहोर, 1883
30. *मूल बीजक* : भाष्य : पूरण साहेब, काशीदास यांच्याकडून सुधारित, लक्ष्मी वेंकटेश्वर प्रेस, मुंबई, 1936
31. *रमैनी* : लाइट प्रेस, बनारस, 1868
32. *शतक* : भाष्य : अखेराय, कबीरचौरा, बनारस, 1901
33. *शब्दावली* : गणपतीदास लक्ष्मणदास, टेपारी (म. प्र.)
34. *शब्दावली* : बेलवेडियर प्रेस, अलाहाबाद, 1922
35. *संत कबीर* : साहित्य भवन, अलाहाबाद, 1943
36. *संत कबीर की शब्दावली* : (संकलन) मणिलाल तुलसीदास मेहता, विठ्ठलदास खेमचंद्र, अहमदाबाद, 1958
37. *संस्कृत बीजक ग्रंथ* : (संस्कृतमध्ये भाषांतर) हनुमानसदास, (सं.) मोतीदास चेतनदास, दुसरी आवृत्ती, स्वसंवेद कार्यालय, बडोदे, 1950
38. *साखी ग्रंथ* : भाष्य : महाराज राघवदास, दुसरी आवृत्ती, बाबू वैजनाथ प्रसाद बुकसेलर्स, बनारस, 1950
39. *हंसमुक्तावली* : रामलाल दयालदास, सुरत, 1893
40. *हंसमुक्ता शब्दावली* : जगन्नाथदास गुरूबक्ष, मुंबई, 1905
41. *ज्ञानसमाज* : गुलजारे हिंद प्रेस, गुरगांव, 1869

**(ब)कबीर-विषयक हिंदी व इंग्रजी ग्रंथ**

(टीप : यातील हिंदी ग्रंथांची सूची कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाचे श्री. कृष्णाचार्य यांच्याकडून प्राप्त झाली. यात डॉ. माताप्रसाद गुप्त यांनी *'हिंदी पुस्तक साहित्य'* (1942) या पुस्तकात संकलित केलेल्या ग्रंथांची नावेही समाविष्ट आहेत.)

1. अग्रवाल तारकनाथ : *कबीर परिचय,* वंगीय हिंदी परिषद, कलकत्ता, 1951

2. केई एफ. इ. : *कबीर अँड हिज फॉलोअर्स,* ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, कलकत्ता, 1931
3. गुप्त शिवचरण : *कबीर साहित्य समीक्षा,* नवयुग पुस्तक भांडार,लखनौ,1965
4. गौड राजेन्द्रसिंह : *संत कबीर दर्शन,* साहित्य भवन, अलाहाबाद, 1955
5. चतुर्वेदी परशुराम : *कबीर-साहित्य की परख,*भारती भांडार, अलाहाबाद,1954
6. टागोर रवीन्द्रनाथ : *वन हंड्रेड पोएम्स ऑफ कबीर,* मॅकमिलन अँड कंपनी, 1915
7. तिवारी भोलानाथ : *कबीर और उनका काव्य,* राजकमल, दिल्ली, 1962
8. त्रिगुणायत गोविंद : *कबीर की विचारधारा,* (पी-एच. डी. साठी स्वीकारलेला शोध-प्रबंध, दुसरी आवृत्ती), साहित्य निकेतन, कानपूर, 1957
9. द्विवेदी केदारनाथ : *कबीर और कबीर पंथ,* तुलनात्मक अभ्यास, हिंदी साहित्य संमेलन, अलाहाबाद, 1965
10. द्विवेदी, हजारीप्रसाद : *कबीर,* सुधारून वाढवलेली दुसरी आवृत्ती, हिंदी ग्रंथ रत्नाकर, मुंबई, 1960
11. बाली तारकनाथ : *युगद्रष्टा कबीर,* विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1957
12. भटनागर रामरतन : *कबीर,* दुसरी आवृत्ती, किताब महल, अलाहाबाद, 1948
13. भटनागर रामरतन : *कबीर साहित्य की भूमिका,* रामनारायण लाल, अलाहाबाद, 1958
14. भारत भूषण 'सरोज' आणि शर्मा श्रीनिवास : *महात्मा कबीर,* हिंदी साहित्य संसार, दिल्ली, 1958
15. मैनी धर्मपाल : *कबीर के धार्मिक विश्वास,* भारतेंदु भवन, चंदीगड
16. वर्मा, रामकुमार : *कबीर का रहस्यवाद,* साहित्य भवन (लि.), पाचवी आवृत्ती, अलाहाबाद, 1944
17. विजयेन्द्र स्नातक (संपादित) : *कबीर,* राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली, 1955
18. वेस्टकॉट जी. एच : *कबीर अँड द कबीर पंथ,* 1907, सुशील गुप्ता लि., 1965.
19. शर्मा सरनामसिंह : *कबीर : एक विवेचन,* हिंदी साहित्य भांडार, दिल्ली, 1960
20. शर्मा सरनामसिंह : *कबीर-विमर्श,* भारत भारती (प्रा.लि.), दिल्ली, 1962
21. श्रीवास्तव पुरुषोत्तमलाल : *कबीर साहित्य का अध्ययन,* साहित्य-रत्नमाला कार्यालय, बनारस, 1951

**(क)भाषांतरकाराच्या टीपा**

1. वरील (अ) आणि (ब) मधील ग्रंथसूची ही 1968 साली प्रकाशित झालेल्या



मूळ इंग्रजी पुस्तकाबरहुकूम आहे. प्रस्तुत अनुवादातील मजकुरात उद्‌धृत केलेल्या अवतरणांचे पृष्ठ क्रमांकही मूळ इंग्रजी पुस्तकानुसार ठेवलेले आहेत. मात्र दरम्यानच्या कालावधीत या सूचीतील बहुतेक ग्रंथांच्या पुढील अनेक आवृत्त्या निघालेल्या असल्याने, सध्या उपलब्ध असलेल्या आवृत्तींतील पृष्ठ क्रमांक, पुस्तकात उद्‌धृत केलेल्या पृष्ठ क्रमांकाशी जुळतीलच असे नाही.
2. मधल्या काळात हिंदी व इंग्रजीत कबीरविषयक अनेक ग्रंथांची भर पडलेली आहे, याचीही जिज्ञासूंनी नोंद घ्यावी.
3. आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या 'कबीर' या सर्वमान्य समजल्या जाणाऱ्या ग्रंथाचा या पुस्तकात अनेकदा उल्लेख आलेला आहे. वरील ग्रंथसूचीत या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशक 'हिंदी ग्रंथ रत्नाकर', मुंबई असे दिलेले असले तरी सध्या हा ग्रंथ 'राजकमल प्रकाशन', दिल्ली यांच्यातर्फे प्रकाशित केला जातो.
4. यासोबत मी मराठीत प्रसिद्ध झालेल्या कबीरविषयक काही पुस्तकांची सूचीही जोडत आहे.

1) कदम स. भा. : *भक्त कबीर,* (प्रस्ता. मो. दि. पराडकर), सत-नाम सत्संग मंडळ, मुंबई, 1991
2) करमळकर विनायकराव : *साक्षात्कारी कबीर,* वि. स. करमळकर, पुणे, 1969
3) कांबळे सुभाष धर्मराज : *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मार्गदर्शक संत कबीर,* दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, 2000
4) कुंटे वामन जनार्दन : *कबीराचे बोल,* परंधाम विद्यापीठ, वर्धा, 1962
5) पटवर्धन पद्मिनीराजे : *भारतीय परंपरा आणि कबीर,* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती 1969, पुनर्मुद्रण,1998
6) पंडित भवानीशंकर श्रीधर : *श्री कबीरवचनावली,* सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे-नागपूर,1961
7) पाटणकर पद्मजा क. : *कबीर साखी सौरभ,* केतन क. पाटणकर, कोल्हापूर,1978
8) पाडगावकर मंगेश : *कबीर,* मौज प्रकाशन गृह, मुंबई,1997
9) तिवारी पारसनाथ, (भाषांतर) कामत अशोक प्रभाकर : *कबीर,* नॅशनल बुक ट्रस्ट, प्रथमावृत्ती 1968, चौथे पुनर्मुद्रण, 1991
10) दुर्गे विनायक गो. : *महात्मा कबीर,* प्रभा प्रकाशन, नागपूर, 1980
11) लव्हात्रे बबन : *बुद्ध -तत्वज्ञानी कबीर,* राहुल कला केन्द्र, नागपूर, द्वितीय आवृत्ती,1999

याशिवाय,

12) *ईश्वरनिष्ठांची मांदियाळी* ,(सं.) रा. चिं. ढेरे, श्रीरामकृष्ण आश्रम, पुणे; या1971साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात ग. वि. अकोलकर यांचा कबिरावर दीर्घ लेख आहे. (पृ. 95-118)

5. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला काही मराठी संग्राहक- प्रकाशकांनी कबिरांचेदोहे व पदे यांचे काही संग्रहही प्रकाशित केले होते. त्यांतील काही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दादरच्या ग्रंथालयात पाहायला मिळाले. त्यांबद्दल माहिती देत आहे.

(1) *कबीरांची पदें प्रारंभ* : पुरंदरे आणि कंपनी, मुंबई, 1892 37 पदांचा संग्रह (पृ. 16, किंमत दीड आणा)

(2) *कबीरपदसंग्रह अथवा पंचरत्न भजनी मेळा* : या पुस्तिकेत कबीर, कमाल,सूरदास, मीराबाई व तुलसीदास या पाच संतांची एकूण 240 पदे असून, त्यावर 'हे पुस्तक रा. सखाराम आबाजी मास्तर, पंढरपूरकर यांजकडून हक्कासह विकत घेऊन यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित, बुकसेलर, पुणे यांनी 1908साली प्रसिद्ध केले' अशी नोंद आहे (पृ. 158, किंमत 8 आणे )

(3) *पदें कबीरकृत* : सखाराम वासुदेव खांडेकर, मुंबई, शके 1810. यात कबिराची 67 पदे, कबीर - रोहिदास संवाद व मोरोपंतांची 3 पदे आहेत. (पृ. 48, किंमत छापलेली नाही )

❑❑❑